cmyk

## संपादकीय

### कर सुलभीकरणाच्या तत्त्वालाच फाटा

देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली वस्तू व सेवा कर समितीची दर दोन महिन्यांनी होणारी बैठक नेहमीप्रमाणे पार पडली. नेहमीप्रमाणेच या बैठकीनंतर कर धोरणाबाबत अनेक गोंधळ समोर आले. एकतर या बैठकीत ज्या प्रकारचे निर्णय घेणे अपेक्षित होते ते निर्णय घेण्यात आले नाहीत आणि जे निर्णय घेण्यात आले ते कर सुलभीकरणाच्या मूलभूत तत्त्वालाच छेद देणारे म्हणता येतील. विशेषतः पॉपकॉर्नवर करनिर्धारण करत असताना ज्या प्रकारचा गोंधळ समोर आला आहे त्याबाबत सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात थट्टा सुरू आहे.


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... ©email:rajyaloktantra75@gmail.com


### दक्षिण कोरियात मोठा विमान अपघात ; १७९ जणांचा मृत्यू

मुआन : दक्षिण कोरियाच्या मुआन आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी १८१ जणांना घेऊन जाणारे जेजू एअरचे विमान कोसळून आग लागली. या अपघातात विमानातील दोन व्यक्तींशिवाय इतर सर्वांचा मृत्यू झाला. दक्षिण कोरियाच्या इतिहासातील सर्वात प्राणघातक विमान अपघातांपैकी हा एक आहे. विमान बँकॉकहून परतत होते. विमानात १८१ प्रवासी आणि सहा कर्मचारी होते. थायलंडमधील बँकॉक येथून निघालेले बोईंग ७३७-८०० जेट हे विमान धावपट्टीवरून घसरले आणि विमानतळावर स्थानिक वेळेनुसार सकाळी ९ वाजता उतरण्याचा प्रयत्न करत असताना एका काँक्रीटच्या भिंतीला धडकले यामुळे विमानतळावरच विमान जळून खाक झाले.


बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२४७ | सोमवार, दि.३० डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये


# शेतकऱ्यांची आज पंजाब बंदची हाक

## रेल्वे रोको, बाजारपेठा राहणार बंद ; शेतकरी नेते सर्वनसिंग पंढेर यांची घोषणा

**चंदिगढ । वृत्तसंस्था**

**शेतकरी नेते जगजित सिंग डल्लेवाल यांचे आमरण उपोषण सुरूच आहे. यामुळे सर्वोच्च न्यायालयाने पंजाब सरकाला खडे बोल सुनावले. त्यांना दवाखान्यात भरती करण्याचे आदेश दिले असतानाच शेतकरी नेते सर्वनसिंग पंढेर यांनी सोमवारी (ता. ३०) पंजाब बंदची हाक देण्यात आल्याची माहिती दिली आहे. यादिवशी संपूर्ण पंजाबमध्ये रेल्वे रोको करण्यात येणार आहे. तसेच बाजारपेठाही बंद राहणार असून, अकाली दल आणि काँग्रेसने आपली भूमीका स्पष्ट करावी, असे आवाहन पंढेर यांनी केले आहे.**



संयुक्त किसान मोर्चा (गैर-राजकीय) आणि किसान मजदूर मोर्चाच्या नेतृत्वाखाली १३ फेब्रुवारी २०२४ पासून शेतकरी आंदोलन करत आहेत. ते पंजाबच्या खनौरी आणि शंभू सीमेवर हमीभाव कायद्यासह विविध १३ मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. दरम्यान याच मागण्यांवरून डल्लेवाल यांनी आमरण उपोषणाचे हत्यार उपसले आहे. त्यांच्या उपोषणाचा रविवारी ३३ वा दिवस होता. याच उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी दोन्ही शेतकरी आघाड्यांतर्फे पंजाब बंदची घोषणा करण्यात आली आहे. पंजाब बंदची संपूर्ण तयारी झाली असून, अनेक संघटना यात सहभागी होतील, पान २ वर


### पंतप्रधानांनी हट्टीपणा सोडून चर्चा करावी- पंढेर

पंजाब बंदबाबत शेतकरी व इतर संघटनांकडून संपूर्ण सहकार्य मिळत असून या बंदमुळे देशातील सरकारच्या कॉर्पोरेट धोरणावर लोक प्रश्न उपस्थित करतील. डल्लेवाल शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी आमरण उपोषणाला बसले आहेत. पण भाजपचे प्रवक्ते डल्लेवाल हट्टी असल्याचा आरोप करत आहेत. ते हट्टी नाहीत, तर शेतकऱ्यांच्या पाठिशी आहेत. हट्टी तर देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री आहेत. पंतप्रधानांनी आपला हट्टीपणा सोडून शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांच्या मागण्या चर्चेतून सोडवाव्यात अशी मागणी पंढेर यांनी केली आहे.

### न्यायालयाने सरकारला फटकारले

न्यायालयाने पंजाब सरकारला फटकारत परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पुरेशी पावले उचलली नाहीत. डल्लेवाल यांच्यावर काही सहकाऱ्यांचा दबाव असून त्यांना रुग्णालयात नेण्यास परवानगी न देणारे शेतकरी नेते त्यांचे हितचिंतक असल्याचे दिसत नाही, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

## रुपाली ठोंबरें विरोधात आव्हाडांकडून बीडमध्ये गुन्हा दाखल



**बीड । प्रतिनिधी**


मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपीला शिक्षा करण्याच्या मागणीसाठी बीडमध्ये शनिवारी सर्वपक्षीय मूक मोर्चा काढण्यात आला होता. त्यानंतर सोशल मीडियावर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांचे कथित व्हॉट्स ॲप चॅट व्हायरल झाले. याप्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीमधील नेत्या रुपाली ठोंबरे यांनी सोशल मीडिया प्लॅफॉर्म एक्सवर एक पोस्ट करत जितेंद्र आव्हाड यांच्यावर आरोप केले. यानंतर आता जितेंद्र आव्हाड यांनी रुपाली ठोंबरे यांच्या विरोधात बीड येथील शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी ट्विट करुन ठोंबरे यांच्या आरोपाला प्रत्युत्तर दिले आहे. पान २ वर

# सीआयडीच्या हाती लागले महत्वाचे पुरावे!

## संतोष देशमुख हत्या प्रकरण:कराडसह चार आरोपिंची खाती गोठवली





**बीड । प्रतिनिधी**

**बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी कारवाईला वेग आला आहे. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील चारही आरोपींची बँक खाती गोठवण्यात आली आहेत. यात वाल्मिक कराडच्या बँक खात्यांचाही समावेश आहे.**

**खंडणी आणि हत्या प्रकरणी पोलिसांची पथके आरोपींच्या शोधासाठी रवाना झाली आहेत.**

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींच्या ठशांचे निशाणही जुळल्याची माहिती समजते. या प्रकरणातील फरार आरोपींच्या शोधासाठी सीआयडीची ९ पथके कार्यरत आहेत. या पथकांमध्ये जवळपास दीडशे अधिकारी आणि कर्मचारी आहेत. वाल्मिक कराडभोवतीचा फास आवळत चालला आहे. त्याचा तपास केला जात असला तरी त्याला अटक कधी करणार असा प्रश्न विचारला जात आहे. स्कॉर्पिओ गाडीत दोन मोबाईल फोन मिळाले. यात मारहाणीचे व्हिडीओ आढळले आहेत. याशिवाय मोबाईलवरून बड्या नेत्याला पान २ वर

### वाल्मिक कराड पुढच्या २४ तासांत सरेंडर होणार?

बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी वाल्मिक कराड पुढच्या २४ तासात सरेंडर होणार अशी चर्चा आता होवू लागली आहे. कारण सुत्रानुसार संतोष देशमुख हत्या प्रकरणात सीआयडीचे ९ पथक तयार करण्यात आले आहेत. आरोपींचे मोबाईल डेटा सीआयडीने तपासले आहेत. वाल्मिक कराडसह फरार आरोपींची संपत्ती जप्त करण्यात आली आहे. तसेच वाल्मिक कराड याच्या नातेवाईकांचीदेखील बँक खाती गोठवण्यात आली आहेत. वाल्मिक कराड याचेही बँक खाते गोठवण्यात आले आहे, अशी देखील माहिती सुत्रांनी दिली आहे. त्यामुळे वाल्मिक कराड हे सरेंडर होऊ शकतात, अशी चर्चा होत आहे.

### तो बडा नेता कोण ? नाव जाहीर करा- दमानिया

संतोष देशमुख यांना ज्या वाहनामध्ये मारण्यात आले ते पोलिसांच्या हाती लागले असून, त्यामध्ये दोन मोबाईल सापडले आहेत. या मोबाईल मध्ये संतोष देशमुख यांना जबर मारहाण करतानाचे व्हिडिओ आहेत. शिवाय याच मोबाईलवरून एका बड्या नेत्याशी संपर्क साधण्यात आला असल्याचे ट्विट अंजली दमानिया यांनी केले आहे. तो बडा नेता कोण आहे त्याचे नाव ताबडतोब जाहीर करा, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली आहे. दुसरीकडे तो बडा नेता कोण असेल याबाबत आता चर्चा सुरू झाली आहे.

## पंकजा मुंडे यांच्याकडून साहित्यिक भाषेत पोस्ट करीत प्राजक्ता माळीचे समर्थन



**मुंबई । प्रतिनिधी**

**भाजप नेत्या आणि राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी ट्विट करुन प्राजक्ता माळीचे समर्थन केले आहे. यासाठी त्यांनी साहित्यिक भाषेचा वापर केला असून, यात कुठेही प्राजक्ता माळीचे नाव घेतले नाही.**

बीड जिल्ह्यातील सरपंच हत्याप्रकरणावरील आरोप-प्रत्यारोप आणि राजकीय फैरी झडत असताना आमदार सुरेश धस यांच्याकडून काही अभिनेत्रींच्या नावाचा उल्लेख करण्यात आला. परळीचा सांस्कृतिक पॅटर्न असे म्हणत आमदार धस यांनी मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळीचे नाव घेतल्यानंतर पान २ वर

## कराडला अटक अन् मुंडेंचा राजीनामा तोपर्यंत आंदोलन-अंजली दमानिया

बीड : सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करणारे आरोपी अजूनही फरार आहेत. यामधील संशयित वाल्मीक कराडला जोपर्यंत अटक होत नाही आणि मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा जोपर्यन्त घेतला जात नाही तोपर्यंत आपण बीड सोडणार नसून, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरूच राहणार असल्याचे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानीया यांनी सांगितले. रविवारी सांगितले.



याबाबत दिलेल्या निवेदनात दमानिया यांनी म्हटले आहे की, मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून यांच्या अत्यंत निर्दयपणे झालेल्या हत्याकांड मागील संशयित आरोपी आणि मास्टर माइंड वाल्मीक कराड याला अटक करावी आणि मुख्यमंत्री देवेंद्र पान २ वर

## दहा-दहा बायका करा, पण कोणाचा खून करु नका-वडेट्टीवार

मुंबई: महाविकास आणि महायुतीमध्ये फरक आहे. हे महाराष्ट्र विकून खातील, तरी त्यांच्यावर कारवाई होणार नाही. महाराष्ट्रात खुलेआम महिलांचे शोषण होईल, खून करतील तरी कारवाई करणार नाहीत. चौकशी करतील. चित्राताई म्हणाल्या, मंत्री करु नये, तरी संजय राठोडांना मंत्री केले गेले. पूजा चव्हाणवरुन आरोप झाल्यानंतर आम्ही जरा सुद्धा वेळ घालवला नाही, लगेच काढून टाकले. इकडे पाहा. प्रेम करणारी असूदेत.. प्रेम करुन मारहाण करतात, सोडूनही देतात. तुमची परवानगी असेल तर १०-१० बायका करा, पण कोणाचा खून तरी करु नका, असे म्हणत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मंत्री धनंजय मुंडेंवर निशाणा साधला. यावेळी त्यांनी भाजप आमदार चित्रा वाघ यांच्यावरही सडकून टीका केली. ते मुंबईतील पत्रकार परिषदेत पान २ वर



## हल्ल्याचा निषेध करीत सर्व ग्रामपंचायतींचे कामकाज तीन दिवस बंद

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील सरपंच हत्या प्रकरण, धाराशिव जिल्ह्यातील सरपंचाला पेट्रोलने जिवंत जाळण्याचा प्रयत्न यासह राज्यात सतत सरपंचांवर होणारे जीवघेणे हल्ले, अशा घटनांच्या निषेधार्थ राज्यभरातील सर्व ग्रामपंचायतींचे कामकाज येत्या ३१ डिसेंबर ते २ जानेवारी दरम्यान ३ दिवस बंद ठेवून शासनाचे लक्ष वेधण्याचा निर्णय महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटनेने घेतला आहे.**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्याची धक्कादायक घटना काही दिवसांपूर्वी घडली. सदर घटनेतील काही आरोपींना पोलिसांनी अटक केली. मात्र, या घटनेतील मुख्य आरोपी मात्र अद्यापही फरार आहेत, त्यांना अटक करण्याच्या मागणीसाठी आणि संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ शनिवारी (२८ डिसेंबर) बीड जिल्ह्यात सर्वपक्षीय मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. अशातच या घटनेचे पडसाद आता राज्यभरात उमटताना दिसत आहेत. महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटनेतर्फे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनही पान २ वर

# आष्टीतील जळजळीत वास्तव!

## आ.सुरेश धस यांनी स्वतःच्या बंगल्यावर बोलावली ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची बैठक, प्रत्येकी दोन हजारांची वर्गणीही केली गोळा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टीचे आमदार सुरेश धस यांचा आणखी एक कारनामा आणि आष्टीत सुरू असलेले जळजळीत वास्तव उघड झाले असून, आज दिनांक २९ डिसेंबर रोजी सुरेश धस यांनी आष्टी येथील आपल्या बंगल्यावर तालुक्यातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत अधिकारी रोजगार सहाय्यक यांची बैठक बोलावली होती. या बैठकीस येणे सर्वांना अनिवार्य करण्यात आले होते तसेच या सर्व लोकांकडून मीटिंग आणि कार्यक्रमाचा खर्च म्हणून प्रत्येकी दोन दोन हजार रुपयांची वसुली केली गेली असल्याचे उघडकीस आले आहे.

रोख रक्कम भुजबळ नावाच्या महिला कर्मचाऱ्याकडे तर फोन पे द्वारे अमोल कर्डिले या ग्रामपंचायत अधिकाऱ्याकडे या दोन दोन हजार रुपयांची वसुली करण्यात आली आहे. खेंगरे भवर मुळीक कर्डिले खिलारे लोंढे पांडुळे बोरुडे तांदळे मोरे अशा जवळपास ५० कर्मचाऱ्यांकडून ही वसुली करण्यात आल्याचे समोर आले असून, याबाबत सोशल मीडियावर देखील काही पोस्ट व्हायरल झाल्या आहेत. आ.सुरेश धस हे आधीच वादाच्या भोवऱ्यात असून मागील पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२७ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २.५० क्विंटल | २,६०० | २,६०० | २,६०० |
| ज्वारी/हायब्रिड: १९.०० क्विंटल | २,१०१ | २,३९५ | २,२३० |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ४१.०० क्विंटल | ६,७०१ | ७,५०० | ७,५०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ७,२०० | ७,२०० | ७,२०० |
| बाजरी: ४.०० क्विंटल | २,८०० | ३,५०० | ३,०७८ |
| मुग : ६.५० क्विंटल | ६,९१० | ६,९१० | ६,९१० |
| सोयाबीन: ७७.५० क्विंटल | ४,०७१ | ४,१११ | ४,०९४ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |

# १५० मतदारसंघात ईव्हीएम गडबड ; महायुतीचा फक्त १०७ जागेवरच विजय

## उत्तम जानकर यांचा खळबळजनक दावा, बारामतीत युगेंद्र पवारच विजयी

**बारामती । प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणूकीच्या दरम्यान जवळपास १५० मतदारसंघात ईव्हीएम गडबड झाली आहे. याची सखोल चौकशी केली तर अजित पवार हे स्वतः २० मतांनी पराभूत झाल्याचे दिसेल, असा दावा करीत माळशिरसचे आमदार उत्तमराव जानकर यांनी खळबळ उडवून दिली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा ईव्हीएमच्या वापरावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. आ. उत्तमराव जानकर यांनी रविवारी सकाळी बारामतीत शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीनंतर त्यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधीशी संवाद साधला.**



सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्याचे आमदार उत्तमराव जानकर यांच्या मतदारसंघातील मारकडवाडी गावात त्यांच्यापेक्षा भाजपाच्या उमेदवाराला मतदान जास्त झाल्याच्या मुद्यावरून गावात मतपत्रिकेवर मतदान घेण्याच्या हालचाली सुरु केल्या. मात्र त्यास निवडणूक आयोगासह स्थानिक प्रशासनाने आक्षेप घेतला. त्यामुळे पुढील होणारा संभावित संघर्ष टळला. त्याचबरोबर निवडणूक आयोग जर मतपत्रिकेवर मतदान घेणार असेल तर आपण आमदारकी पदाचा राजीनामा देऊ आणि पुन्हा निवडणूकीला सामोरे जावू असे आव्हानही यावेळी निवडणूक आयोगाला दिले. आमदार उत्तमराव जानकर हे आपल्या भूमिकेवर ठाम असून त्यांनी भूमिका स्पष्ट करताना, १५० मतदारसंघात ईव्हीएम गडबड झाल्याचा दावा करत बारामतीत अजित पवार नाही तर युगेंद्र पवार हेच विजयी झाले असल्याचा दावा केला. यासंदर्भात बोलताना आमदार उत्तम जानकर म्हणाले की, आपण ईव्हीएमचा अभ्यास केला असून विधानसभा निवडणूकीत महायुतीला बहुमतच मिळाले नाही. तसेच यावेळी त्यांनी महायुतीला नेमक्या किती जागा मिळाल्या याची माहितीच आकडेवारीसह दिली. महायुतीला पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# कर सुलभीकरणाच्या तत्त्वालाच फाटा

देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली वस्तू व सेवा कर समितीची दर दोन महिन्यांनी होणारी बैठक नेहमीप्रमाणे पार पडली. नेहमीप्रमाणेच या बैठकीनंतर कर धोरणाबाबत अनेक गोंधळ समोर आले. एकतर या बैठकीत ज्या प्रकारचे निर्णय घेणे अपेक्षित होते ते निर्णय घेण्यात आले नाहीत आणि जे निर्णय घेण्यात आले ते कर सुलभीकरणाच्या मूलभूत तत्त्वालाच छेद देणारे म्हणता येतील. विशेषतः पॉपकॉर्नवर करनिर्धारण करत असताना ज्या प्रकारचा गोंधळ समोर आला आहे त्याबाबत सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात थट्टा सुरू आहे.

'एक देश एक कर एक बाजारपेठ' या मूलभूत तत्त्वाप्रमाणे देशात वस्तू व सेवा कर सुरू होऊन आता आठ वर्षे होऊन गेली आहेत; पण अद्यापही या अप्रत्यक्ष कर धोरणाबाबतचा गोंधळ कायम आहे. प्राप्तिकराचे निर्णय जरी वर्षातून एकदा अर्थसंकल्पामध्ये घेतले जात असले, तरी वस्तू व सेवा कराबाबतचे निर्णय दर दोन महिन्यांनी होणाऱ्या वस्तू व कर समितीच्या बैठकीमध्ये घेतले जातात. केंद्रीय अर्थमंत्र्यांसह देशातील सर्व राज्यांचे अर्थमंत्री या बैठकीला जरी उपस्थित राहात असले, तरी वस्तू व सेवा कर सुलभ करण्याकडे अद्यापही या समितीने लक्ष दिलेले नाही. मुळात जेव्हा वस्तू व सेवा कर कायदा अस्तित्वात आला तेव्हाच त्या कायद्याबाबत अनेक गोंधळ होते. हा कायदा संसदेत संमत झाल्यानंतरच्या दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये सरकारला याबाबत शेकडो खुलासे करावे लागले होते आणि अजूनही याबाबत खुलासे चालूच आहेत. 'एक देश एक कर प्रणाली' यामुळे अर्थव्यवस्थेला शिस्त लागेल आणि सर्व व्यवहार सोपे, सुलभ आणि सुरळीत होतील असे वाटत असताना वस्तू व सेवा कर कायद्यातील काही तरतुदींमुळे गोंधळ वाढण्याची स्थिती अनेक वेळा निर्माण होताना दिसत आहे.

सर्वसामान्य करदात्यांसह कर नियोजनाचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनाही सोपी वाटेल अशा प्रकारची करप्रणाली असावी असे तत्त्व सर्वसाधारणपणे सर्व अर्थव्यवस्थांमध्ये पाळले जाते; पण भारतीय वस्तू व सेवा कर कायद्यामध्ये मात्र कर सुलभीकरणाच्या तत्त्वालाच फाटा दिला आहे, असे दिसते. ज्या प्रकारे पॉपकॉर्नवर विविध तीन प्रकारचा कर लावण्याचा निर्णय या मीटिंगमध्ये घेण्यात आला ते पाहता सर्वसामान्यांच्या आणि व्यापाऱ्यांच्या मनातील गोंधळही वाढणार आहे. याबाबत सरकारने पुन्हा नवीन खुलासा केला आहे. एकीकडे अशा प्रकारचे निर्णय होत असताना दुसरीकडे विमा या महत्त्वाच्या विषयावर जो कर आकारला जातो तो कमी करणे किंवा पूर्ण रद्द करणे याबाबतचा निर्णय मात्र अद्यापही समितीला घेता आलेला नाही.

विम्यातील गुंतवणूक एकीकडे करदात्याला आयकरामध्ये सवलत देत असताना त्याच विम्यात गुंतवणूक करत असताना मात्र करदात्याला वस्तू सेवा कर मात्र भरावा लागतो. हा विरोधाभास संपवण्याचे काम वस्तू व सेवा कर समिती कधी करणार आहे हे समजत नाही. समितीच्या पुढील बैठकीमध्ये याबाबत निर्णय होण्याचे संकेत जरी देण्यात आले असले तरी जो काही निर्णय होईल त्यामुळे कर सुलभीकरणाची प्रक्रिया सुरळीत होईल आणि गोंधळ वाढणार नाही याची काळजी समितीला घ्यावीच लागेल. सध्या भारतीय वस्तू व सेवा कर प्रणालीमध्ये ०%, ५%, १२%, १८% आणि २८% असे टप्पे आहेत. या टप्प्यांची संख्या कमी करावी याबाबतचा विचारही काही कालावधीपासून सुरू आहे. पण याबाबत अद्याप सरकारने कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे तो गोंधळ कायम आहे. सरकार इलेक्ट्रिक वाहनांच्या विक्रीला प्रोत्साहन देत असताना दुसरीकडे सरकारने जुन्या वाहनांच्या विक्रीवर असणारा वस्तू व सेवा कर वाढवला आहे ज्यामध्ये इलेक्ट्रिक वाहनांचाही समावेश आहे. म्हणजेच सरकारच्या मूळ धोरणाला छेद देण्याचे अनेक निर्णय जर वस्तू व सेवा कर समितीच्या बैठकीत होत असतील, तर कुठेतरी काहीतरी चुकत आहे हे लक्षात घ्यावे लागेल. सरकार जरी ठराविक कालावधीनंतर वस्तू व सेवा कराच्या संकलनामध्ये होत असलेली वाढ याबाबत निर्णय जाहीर करत असले आणि ही वाढ अभिनंदनीय असली तरी अद्याप ही कर प्रणाली सर्वसामान्य व्यापारी आणि अनेक संबंधितांसाठी साधी सोपी ठरलेली नाही.

गेल्या काही वर्षांत अर्थसंकल्पामध्ये सरकारने जाणीवपूर्वक प्रयत्न करून प्रत्यक्ष कराची प्रणाली साधी व सोपी केली आहे पण तशाच प्रकारचा निर्णय अप्रत्यक्ष कराबाबत म्हणजेच वस्तू व सेवा कराबाबत घेण्यात सरकार अद्याप पुढाकार घेत नाही. वस्तू व सेवा कराशी व्यापाऱ्यांचा दररोज संबंध येतो आणि रिटर्न भरण्याच्या निमित्ताने मासिक किंवा त्रैमासिक या प्रणालीचा विचार करावा लागतो. म्हणजे देशातील कोट्यवधी व्यापारी आणि व्यावसायिक यांच्यासाठी वस्तू व सेवा कर हा दैनंदिन जिव्हाळ्याचा विषय झाला आहे.

## एफर्ट इंग्लिश स्कूल, किट्टिआडगाव वार्षिक पालक मेळावा उत्साहात

वडवणी । प्रतिनिधी

**किटिआडगाव एफर्ट इंग्लिश स्कूलचा वार्षिक पालक मेळावा २५ डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी विविध पदार्थांचे स्टॉल लावून विक्री करत व्यावहारिक ज्ञान प्राप्त केले. 'आनंद नगरी' या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्यांची प्रात्यक्षिके सादर केली, ज्यामुळे त्यांना व्यावसायिकता आणि जीवन कौशल्ये शिकता आली.**

कार्यक्रमाच्या प्रारंभात किटिआडगावचे सरपंच मा. रुक्मानंद खेत्रे, माजी सरपंच मा. बाबा नाना आगे, तसेच प्रमुख पाहुणे कविवर्य मा. मोहन राठोड सर, मा.बालाप्रसाद चव्हाण सर उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शिका मा.संजीवणी ताई राऊत यांनी पालकांना मार्गदर्शन केले आणि त्यांना समाजातील विविध भूमिकांसाठी प्रेरित केले.शाळेचे संचालक मा. श्री. कैलास वाव्हळकर सर यांनी शाळेच्या शैक्षणिक प्रगतीसह विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासावर विशेष लक्ष केंद्रित केले. त्यांनी शाळेच्या प्रगतीचा अहवाल सादर करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि मानसिक विकासावर जोर दिला. कार्यक्रमात प्रमुख उपस्थित म्हणून मा. सुभाष बोराडे सर आणि मा. अँड.रविकांत उघडे सर यांनी आपले मार्गदर्शन केले. या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सुनिता वाव्हळकर मॅडम यांनी अभार प्रदर्शन केले आणि विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. भगवान ससाने यांनी केले, तर शाळेच्या सहशिक्षिका सौ. पुजा काळे मॅडम आणि रेणुका वाघमारे मॅडम यांच्या अथक परिश्रमामुळे हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.यावर्षीच्या पालक मेळाव्याने शाळेच्या शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांची गोडी वाढवली असून, विद्यार्थ्यांना जीवनाच्या विविध पैलूंवर काम करण्याची अनोखी संधी दिली.

## स्व.प्राचार्य बी.के.सबनीस राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**श्री योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय,अंबाजोगाई येथे मागील वीस वर्षापासून स्व.प्राचार्य बी.के.सबनीस यांच्या स्मृती प्रित्यर्थ वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येते. या वर्षी दि. ९ जानेवारी २०२५, गुरुवार रोजी सकाळी या स्पर्धेचे उद्घाटन ज्येष्ठ विचारवंत, पत्रकार प्रा.डॉ.जयदेव डोळे यांच्या हस्ते होत असून या वेळी संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, विधिज्ञ जगदीश चौसाळकर, उपप्राचार्य प्रा.पी.एस.कुलकर्णी या प्रसंगी उपस्थित राहणार आहेत.**




यावर्षी स्पर्धेसाठी समाननागरीकायदा. गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता. आर्थिक उदारीकरणाचे परिणाम.भारतीय संविधानाची अमृत महोत्सवी वाटचाल हे विषय आहेत. स्पर्धेसाठी राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी सुरू केली आहे. स्पर्धा ऑफलाइन पद्धतीने होणार असून विद्यार्थ्यांची निवास आणि भोजनाची सोय करण्यात आली आहे. स्व.प्राचार्य हे महाराष्ट्रातील एक नामांकित प्राचार्य व प्रसिद्ध विचारवंत होते. स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाची धुरा त्यांनी २१ वर्ष यशस्वीपणे सांभाळून महाविद्यालयाचा नावलौकीक वाढविला. विद्यार्थ्यांनी अभ्यास करुन बोलते व्हावे, बोलायला शिकावे आणि त्या माध्यमातून देश, समाजाच्या समस्यांचा वेध घ्यावा. सर्जनशील विचार निर्मावेत. योग्य कार्याच्या प्रेरणा निर्माण व्हाव्यात असे प्राचार्य सबनीस सरांना नेहमी वाटायचे.सबनीस सरांच्या या विचारांचा वारसा तेवत ठेवण्यासाठीच प्रस्तूत स्पर्धेचे आयोजन स्वा.रा.ती.महाविद्यालय व श्री. योगेश्वरी शिक्षण संस्था पगारदार कर्मचारी सह.पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येते. या स्पर्धेचा समारोप समारंभ योगेश्वरी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास यांच्या अध्यक्षतेखाली होत असून प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ पत्रकार नानासाहेब गाठाळ उपस्थित राहणार आहेत. तसेच यावेळी ज्येष्ठ सल्लागार प्रा. माणिकराव लोमटे आणि प्रा एन.के. गोलेगावकर यांची विशेष उपस्थिती आहे. या स्पर्धेचे परीक्षण नामवंत तज्ञ व जाणकार प्राध्यापक आणि अध्यापक यांच्या समिती मार्फत होणार असून स्पर्धा वरीष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी असून प्रत्येक महाविद्यालयास दोन विद्यार्थ्यांचा संघ या स्पर्धेसाठी पाठविता येईल. स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम-१००००/-रु. व प्रमाणपत्र, द्वितीय- ७०००/-रु. व प्रमाणपत्र, तृतीय ५०००/- व प्रमाणपत्र, उत्तेजनार्थ ३०००/- व प्रमाणपत्र अशी पारितोषिके व शील्ड तर वैयक्तिक पातळीवर प्रथम ५०००/- रू. द्वितीय ३०००/- तृतीय २०००/- तर उत्तेजनार्थ १०००/- रू. आणि प्रमाणपत्र व शील्ड दिले जाणार असून सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सुद्धा प्रमाणपत्र दिले जाणार आहेत. महाराष्ट्रातील वरीष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अधिकाधिक संख्येने या स्पर्धेत सहभाग घ्यावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रशेखर बर्दापूरकर, सचिव श्री कमलाकर चौसाळकर, सर्व पदाधिकारी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.आर.थारकर, यो.शि.सं.प.कर्म.सह. पतसंस्थेचे अध्यक्ष बी के मसने, उपप्राचार्य रमेश सोनटक्के, उपप्राचार्य डॉ.जितेंद्र देशपांडे, डॉ.गंगाधरआकलोड, डॉ.शैलजा बरूरे, जवळगावकर, एस के रामदासी आणि स्पर्धा संयोजक प्रा.रमेश सोनवळकर यांनी केलेले आहे.

## प्राजक्ता माळीच्या तक्रारीची महिला आयोगाकडून दखल

मुंबई । प्रतिनिधी

**भाजपचे आमदार सुरेश धस यांनी शुक्रवारी (दि.२७) परळीमध्ये इव्हेंट मॅनेजमेंट पॉलिटिक्स चालते, असा आरोप केला होता. त्यांच्या या वक्तव्यावरून अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. यानंतर तिने पत्रकार परिषद घेत धस यांनी माफी मागावी, अशी मागणी केली होती. माध्यमांशी बोलताना धस यांनी प्राजक्ता माळी हिची मागणी धुडकावून लावली होती. दरम्यान, राज्य महिला आयोगाने या प्रकरणाची दखल घेतल्याचे अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी रविवारी (दि.२९) सांगितले. त्यांनी या प्रकरणी सोशल मीडिया-प्लॅटफॉर्मवर पोस्ट केली आहे.**



चाकणकर यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे की, "अभिनेत्री प्राजक्ता माळी यांची तक्रार आयोग कार्यालयास प्राप्त झाली आहे. त्याचा अभ्यास केला जाईल. कायदेशीर बाबी तपासून आवश्यक ती कार्यवाही नियमानुसार राज्य महिला आयोग करेल" महिलांबाबत समाज माध्यमांसमोर बोलताना सर्वांनी भान ठेवले पाहिजे. कारण संविधानाने दिलेल्या अधिकारामुळे सर्व क्षेत्रांमध्ये महिला स्वतःच्या कर्तृत्वावर काम करत आहेत. काम करताना समाज माध्यमांद्वारे केवळ त्या महिला आहेत म्हणून कोणताही पुरावा नसताना बदनामी करणारे वक्तव्य, सर्व घटकांनी शहानिशा न करता समाज माध्यमात घाणेरड्या पद्धतीने ट्रोल करण्याविरोधात याबाबत शासनाकडून कठोर कारवाई करण्याबाबत आयोग पुढाकार घेईल, असेही चाकणकर यांनी स्पष्ट केले आहे.

# खराब धान्य दिल्यास तक्रार करा, कारवाई करणार-पुरवठा निरीक्षक खांडेभराड

अंबड । प्रतिनिधी

अंबड शहरातील समर्थ विद्यालय येथे राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व वकील संघ अंबड तसेच तहसील कार्यालय अंबड यांच्या संयुक्त विद्यमानाने राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला आहे. नागरिकांना आपले हक्क काय आहे आणि आपण प्रत्येक दुकानदाराचे ग्राहक म्हणून काही खबरदारी घेण्याची गरज आहे जेणेकरून आपल्याला कोणी काही वस्तू किंवा धान्य कालबाह्य दिली आहे का किंवा ती खराब आहे याकडे देखील बारक्याने लक्ष देण्याची गरज आहे. असे काळजी ग्राहकाने घ्यावे असे आवाहन अंबड तहसीलचे पुरवठा निरीक्षक किरण कुमार खांडेभराड बोलताना ग्राहकांना मार्गदर्शन केले यावेळी अँड श्रीमती अशा गाडेकर यांनी देखील मुलींना आपले संरक्षण कसे करता येईल याचे देखील मोलाचे मार्गदर्शन केले त्यापुढे म्हणाल्या की आपल्याला जर कोणी काही त्रास देत असेल तर आपण आपल्या पालकांना किंवा शिक्षकांना याची आवर्जून माहिती द्यावी जेणेकरून कोणतेही दुर्घटना किंवा वाद होणार नाही याची देखील विद्यार्थ्यांना जाणीव असली पाहिजे आणि विद्यार्थिनींना आपले संरक्षण कसे करावे यांची देखील सविस्तरपणे त्यांना मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले आहे. पुरवठा निरीक्षक श्री खांडेभराड यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करून त्यांना काय करावे यांची माहिती दिली भारतामध्ये राष्ट्रीय ग्राहक दिन हा १९८६ पासून हा कायदा अमलात यावा म्हणून अनेक संस्था आणि कार्यकर्ते यांनी प्रयत्न करावा लागले होता. तसेच आपले मूलभूत हक्क, गरजा यामध्ये आपण कोणत्याही दुकानात गेलो तर आपण कोणती खबरदारी घ्यावी तसेच आपण काय करावे, कशाप्रकारे दक्षता घ्यावी आपले जे हक्क आहे. आपण नेमक्या कोणत्या दुकानात जाता यावेळीआपण काळजीपूर्वक बारकाईने लक्ष देण्याची गरज आहे तसेच जर स्वस्त धान्य दुकानदार आपल्याला जर आपला अंगठा घेऊन योग्य धान्य - देतो का असे देखील पाहण्याची गरज आहे प्रत्येक दुकानदारांकडून ग्राहकाने आपल्याला शासनाने किती धान्य दिला आहे याची देखील दुकानदारांकडून - पावती घेणे गरजेचे आहे. जर आपण एखाद्या मेडिकल, किराणा व इतर दुकानात गेलो असता आपण घेतलेल्या - वस्तूवर मॅन्युफॅक्चरिंग दिनांक आहे का - किंवा ते काल बाह्य झालेले आहे का - याकडे देखील बारक्याने लक्ष देण्याची गरज आहे. एखादी वस्तू घेतल्यावर - त्यावर जर काही आपल्याला कालबाह्य यासारख्या दिनांक आढळल्यास त्या दुकानदारांची तक्रार निवारण प्रणालीवर दाखल करू शकता यावर संबंधित सर्वच कार्यालयांची तक्रार आपण करू शकतात जेणेकरून दुसऱ्याची फसवणूक किंवा त्यांना कालबाह्य धान्य, औषध व इतर वस्तू देण्यास प्रतिबंधक करण्यात होईल. ग्राहकांना आपले हक्क बजावण्यासाठी आपला आपणच कर्तव्यदक्ष राहिल्यास कोणत्याही ग्राहकाची फसवणूक होणार नाही याची देखील दुकानदारांनी किंवा व्यापाऱ्यांनी दक्षता घ्यावी असे पुरवठा निरीक्षक श्री खांडेभराड म्हणाले आहे. समर्थ विद्यालय हे शाळा गेल्या अनेक वर्षापासून गोरगरीब विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम करत आहेत यामध्ये ग्रामीण भागातून येणारे सर्वाधिक विद्यार्थी आणि विद्यार्थिनी असून यांना शाळांमार्फत गणवेश पुस्तक व इतर ज्या किट असेल त्या मोफत पणे दिली जात आहे जेणेकरून विद्यार्थ्यांना आपले बहुतव्य घडवण्यासाठी शाळेचे सर्व शिक्षकांचा मुळाचे मार्गदर्शन आहे. समर्थ शाळेमधून अनेक विद्यार्थी येणे मार्गदर्शन समजून घेतले यावेळी अधिकारी, डॉक्टर, वकील शिक्षक व इतर शासकीय कार्यालयातील कर्मचारी अधिकारी शिक्षक महिला व मुली मोठ्या प्रमाणात या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली.

# सरकारने डॉ.मनमोहन सिंह यांचा अपमान केला!

## प्रियांका गांधी वड्रा यांचा आरोप, स्मारकाच्या जागेवरून काँग्रेसचा भाजपावर हल्लाबोल

नवी दिल्ली । वृतसंस्था

**माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आल्याच्या काही तासांनंतर, राजधानीतील त्यांच्या स्मारकाच्या जागेवरून काँग्रेस आणि सत्ताधारी भाजपामध्ये एकमेकांच्या विरोधात आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडायला सुरुवात झाली आहे. वायनाडच्या खासदार प्रियांका गांधी वांड्रा यांनी केंद्र सरकारवर हल्लाबोल करत म्हटले आहे की, सरकारने निगमबोध घाट स्मशानभूमीत त्यांचे अंत्यसंस्कार करून सिंह यांचा "अपमान" केला आहे.**

प्रियांका गांधी-वड्रा यांच्या या आरोपानंतर केंद्रीय मंत्री आणि भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनी प्रत्युत्तर देत काँग्रेसवर आरोप केला की, त्यांनी सिंह यांच्या स्मारकासाठी जागा शॉर्टलिस्ट केली होती आणि त्यांच्या कुटुंबालाही त्याबद्दल माहिती दिली होती. तरीही काँग्रेस खोटी माहिती पसरवत असल्याचा आरोप केला. पुढे बोलताना जे पी नड्डा म्हणाले की, माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंग यांच्या स्मारक असलेल्या किसान घाटाजवळील जागा डॉ मनमोहन सिंह यांच्या स्मारकासाठी विचारात घेतलेल्या स्थानांपैकी एक आहे. तर काँग्रेसने इंदिरा गांधी यांचे स्मारक असलेल्या शक्तीस्थळाच्या परिसरात जागा देण्याची मागणी करत ती जागा सुचविली होती. तसेच किसान घाट आणि शक्तीस्थळ दोन्ही स्मारक महात्मा गांधी यांचे स्मारक असलेल्या राजघाटापासून फार दूर नाहीत.

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांची आज

अशी माहितीही पंढेर यांनी दिली आहे. शेतकरी आंदोलनाला देशभरातील शेतकरी, सामाजिक संघटना आणि मजुरांनी मोठ्या संख्येने पाठिंबा द्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे. बंदअंतर्गत वाहतूक पूर्णपणे बंद राहणार असून रेल्वे रोको केला जाणार आहे. मात्र, आपत्कालीन सेवा सुरू राहिल, असेही पंढेर यांनी म्हटले आहे. पंढेर म्हणाले की, ३० डिसेंबर रोजी पंजाब बंदची हाक देण्यात आली आहे. यावेळी राज्यभरातील पेट्रोल पंप आणि गॅस एजन्सी पूर्णपणे बंद राहतील. वाहतूक पूर्णपणे बंद राहील. रेल्वे सेवाही बंद राहतील. बाजारपेठा देखील बंद राहणार असून वैद्यकीय सेवा, विवाह कार्यक्रम, विमान सेवा तसेच अत्यावश्यक सेवांसह परीक्षा थांबवली जाणार नाही, असे पंढेर यांनी म्हटले आहे. दरम्यान, पंजाब सरकारने ते कोणासोबत आहेत हे एकदा स्पष्ट करावे. तसेच अकाली दल आणि काँग्रेसनेही रविवारी होणाऱ्या आंदोलनाबाबत भूमीका स्पष्ट करावी, असेही पंढेर यांनी म्हटले आहे.

------------

### सीआयडीच्या हाती

फोन केल्याचेही समजते. सीआयडीच्या हाती मोठे पुरावे लागले आहेत. गुन्ह्यात वापरलेली स्कॉर्पिओ गाडी जप्त करण्यात आली आहे. याच गाडीत दोन फोन सापडले आहेत. या फोनमधील डेटा रिकव्हर करण्यात येत आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींच्या पासपोर्टची माहितीसुद्धा मिळवण्यात आली आहे. संतोष देशमुख यांना चार वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन मारहाण करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

------------

### रुपाली ठोंबरे विरोधात आव्हाडांकडून

आव्हाड यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे की, "माझा खोटा व्हॉट्सॲप चॅटचा व्हायरल करणाऱ्यांविरुद्ध मी बीडमधील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात रितसर गुन्हा (एफआयआर) दाखल केला आहे. कर नाही तो डर कशाला? हा व्हॉट्स ॲप चॅटचा स्क्रीनशॉट कसा खोटा (मॉर्फ केलेला) आहे, याची संपूर्ण माहाती मी ट्वीटद्वारे (एक्स पोस्टद्वारे) दिली आहे. त्याचा वापर केला तर पोलिसांना, ' चौकशी सुरू आहे' हे सांगण्याचे कारणच उरणार नाही. मी स्वतःच सर्व तांत्रिक बाबी माझ्या ट्वीटमध्ये सांगितलेल्या आहेत, असंही जितेंद्र आव्हाड यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे. तसेच जितेंद्र आव्हाड यांनी एक्सवर पोस्ट करत सदर चॅट खोटी असल्याचे स्पष्ट केले आहे.

-------------

### पंकजा मुंडे यांच्याकडून साहित्यिक भाषेत

ह्या प्रकरणाला वेगळंच वळण लागले आहे. सुरेश धस यांच्या वक्तव्यानंतर प्राजक्ता माळीने शरिवारी पत्रकार परिषद घेऊन धसांनी माफी मागावी अशी मागणी केली शिवाय माळी यांनी महिला आयोगकडेही तक्रार केली. यावर आपण माफी मागणार नसल्याचे आ.धस यांनी स्पष्टपणे सांगितले. यावर आता मंत्री पंकजा मुंडे यांनी एक पोस्ट करीत काल पाहवलं नाही... आणि प्राजक्ताची पवित्र फुलं, असे म्हणत प्राजक्ता माळीच्या पत्रकार परिषदेवर भाष्य केले. तसेच, सर्वच महिलांनी कणखर राहायला हवं, स्वत:ला कणखर बनवायला हवं, असे म्हणत साहित्यिक भाषेतून समर्थन केले आहे.

-----------

### दहा-दहा बायका करा, पण

बोलत होते. विजय वडेट्टीवार म्हणाले, संतोष देशमुख यांचे कुटूंब अजूनही रडत आहे. महिलांच्या शोषनाच्याही अनेक घटना घडल्या आहेत. सरकारने या संदर्भात सीबीआय चौकशी केली पाहिजे. आकाच्या वर बाका आहे ते हे सर्व वाचवतोय. स्पेशल टीम लावली नाही, तुम्ही आरोपी शोधत नाही. मालमत्ता जप्त करत आहेत, त्या खंडणी गोळा करुन जमा केल्या आहेत. प्राजक्ता माळींबाबत बोलणार नाही. मात्र फिल्म इंडस्ट्रीतून यावर कोणी बोलत नाही. थरमल पॉवरमध्ये खंडणी दिल्याशिवाय कोणीही काम करु शकत नाही, याची सीबीआय चौकशी करा. कोणी कुठेही लपले तर पोलिस शोधून आणतात. पहिले आरोपीला अटक करा. अंजली दमानिया म्हणतात त्यात तथ्य असू शकते. अक्षय शिंदेला मारले कारण मुख्य आरोपीपर्यंत पोहचू नये. तसे यातही तथ्य असू शकते. तपास पूर्ण होईपर्यंत धनंजय मुंडे यांना मंत्रिपदापासून दूर ठेवले पाहिजे, असेही वडेट्टीवार म्हणाले. एवढा मोठां मोर्चा झाल्यावर सरकार खडबून जागे होईल असे वाटले होते पण अजूनही कारवाई नाही. आघाडी आणि युती सरकारमधील हा फरक आहे. हे महाराष्ट्र विकून काढतील तरी कारवाई होणार नाही, असे ते म्हणाले.

-------------

### कराडला अटक अन् मुंडेंचा राजीनामा

फडणवीसानी मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा. या प्रमुख दोन मागण्यासाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुर केले असून, या मागण्या मान्य होईपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हे ठिय्या आंदोलन सुरूच राहणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. यामधून संतोष देशमुख यांना न्याय मिळावा, बीडच्या जनतेतील दहशत नाहीशी करावी एव्हढाच उद्देश असून राजकीय वरदहस्त असलेला हत्येमागील आरोपी, वाल्मीक कराड २० दिवस उलटून गेल्यावरही मोकाटपणे बाहेर फिरतो आहे. तरी त्याला अटक होऊन चौकशी करून त्याच्यावर व त्यात सामील असलेल्या इतर लोकांवर कायदेशीर कारवाई व्हायला हवी अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच या दरम्यान आपण वाल्मीक कराड याच्या काळ्या धंद्यांचे पितळ उघडे पाडणार असल्याचे त्यांनी सांगितले. तरी त्याला अटक होऊन चौकशी करून त्याच्यावर व त्यात सामील असलेल्या इतर लोकांवर कायदेशीर कारवाई व्हायला हवी अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच या दरम्यान आपण वाल्मीक कराड याच्या काळ्या धंद्यांचे पितळ उघडे पाडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

---------------

### आष्टीतील जळजळीत

दोन चार दिवसात केलेल्या काही आरोपांमध्ये तोंडावर पडल्याने ते चर्चेत आहेत. त्यातच आता ग्रामपंचायतचे सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत अधिकारी ते अगदी अत्यंत कमी पगारावर काम करणारे रोजगार सहाय्यक यांच्याकडून स्वतःच्याच बंगल्यावर बोलावलेल्या बैठकीसाठी अशा प्रकारे सक्तीची वसुली करून दोन-दोन हजार रुपये गोळा केल्याने, धस आणखीनच वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. तर दुसरीकडे अशा प्रकारची शासकीय कर्मचाऱ्यांकडून केली जाणारी वसुली ही बेकायदेशीर असून याबाबतीत जिल्हाधिकारी चौकशी करून कारवाई करणार का असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

----------

### हल्ल्याचा निषेध करीत सर्व

देण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग या गावचे आदर्श माजी सरपंचाचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. ही घटना ताजी असतानाच पुन्हा सरपंचावरील जीवघेण्या हल्ल्याच्या दुसऱ्या घटनेने महाराष्ट्र हादरला आहे. धाराशिव जिल्ह्यातील सरपंचाच्या कारची तोडफोड करून पेट्रोलने जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यावरून सरपंच संघटना आक्रमक झाली आहे. राज्यात अशा घटना घडणे हे अतिशय चिंताजनक असून सरपंचांनी गावगाडा चालवायचा कसा? त्यांच्या सुरक्षेची हमी घ्यायची कुणी? असा सवाल करत अशा घटनावर आळा घालण्यासाठी शासनाने कठोर पावले उचलावीत. सरपंच सुरक्षेसाठी कायदा करावा, हत्या प्रकरणातील आरोपींना तातडीने अटक करून त्या मागच्या मास्टरमाईंडचा शोध घेण्यात यावा. सरपंच तथा ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना कायदेशीर संरक्षण देण्यात यावे, अशी सरपंच संघटनेची मागणी आहे.

---------

### १५० मतदारसंघात ईव्हीएम गडबड ;

मिळालेल्या जागांबाबत बोलताना उत्तम जानकर म्हणाले की, अजित पवार गटाचे केवळ १२ आमदार निवडूण आले. तर एकनाथ शिंदे यांचे केवळ १८ आमदार निवडूण आले. तर भाजपाचे केवळ ७७ आमदार निव्वळ निवडून आले. त्यामुळे महायुतीला एकूण १०७ जागा मिळाल्या. आणखी दोन-चार अपक्षांचा विचार केला तर ही संख्या ११० वर जात असल्याचे सांगत मी सर्व मतदारसंघाचा अभ्यास केला असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना आमदार उत्तम जानकर म्हणाले की, ईव्हीएममध्ये गडबड होत असून मतदान केल्यानंतर जी पावती बाहेर येते ती पावती मतदारांच्या हाती द्यायला हवी. तसेच त्या मतदारांना ती स्वतःहून त्यांच्या बॉक्समध्ये टाकायला लावण्याची परवानगी दिली पाहिजे अशी मागणीही यावेळी करत ईव्हीएममधील गडबडीची माहिती काँग्रेस नेते राहुल गांधी आणि शरद पवार व निवडणूक आयोगाच्या लक्षात आणून देणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.



यज्ञयाजी यज्ञेश्वर शास्त्री सेलूकर महाराज यांनी रविवारी श्रीदत्त मंदिर दत्तधाम येथे भेट देऊन श्रीदत्त दर्शन घेत आरती केली. यावेळी मंदिराच्या वतीने प्रशांत सुलाखे यांनी स्वागत केले. यावेळी संतोष रत्नपारखी, किशोर चव्हाण, विलास खडके,प्रकाश देशमुख,वैभव देशमुख, संतोष कुरलेकर आदी उपस्थित होते.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. ३० डिसेंबर २०२४



# पक्षसंघटना वाढविण्यासाठी पक्षाने दिलेले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडा - भास्कर आबा दानवे

जालना । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय जालना येथे माजी केंद्रीय राज्यमंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली व जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे, महानगर जिल्हाध्यक्ष सतीष जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपा जालना महानगरातील मंडळांची सदस्यता नोंदणी अभियान कार्यशाळा आयोजीत करण्यात आली.



यावेळी भास्कर आबा दानवे यांनी आयोजित केलेल्या भाजपा सदस्यता नोंदणी अभियान कार्यशाळेमध्ये उपस्थित राहून जालना महानगरातून आलेल्या भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी मार्गदर्शनात्मक संवाद साधला, भारतीय जनता पक्ष हा कार्यकर्त्यांचा पक्ष असून प्रत्येक कार्यकर्ता आणि पदाधिकारी हा पक्षाचा आधारस्तंभ आहे. भाजपची संघटना अधिक बळकट व्हावी आणि आगामी निवडणुकांमध्ये पक्षाचे वर्चस्व वाढावे, यासाठी सदस्य नोंदणी अभियान महत्त्वपूर्ण आहे. आगामी महापालिकेच्या निवडणुकीमध्ये यश मिळवण्यासाठी प्रत्येक घराघरात पोहोचण्याचे काम या सदस्यता अभियानाद्वारे करावे लागेल. भाजपा पक्ष हा एक विशाल कुटुंब आहे. अधिक सदस्य नोंदणी केल्याने पक्षाची ताकद वाढते आणि आपण अधिक लोकांपर्यंत पोहोचू शकतो. सदस्यता नोंदणी फक्त संख्येची बाब नाही, तर ती प्रत्येक कार्यकर्त्याला पक्षाची निती, तत्त्वे आणि ध्येय समजून त्यामध्ये सक्रियपणे सहभागी होण्याची संधी देते. सदस्य नोंदणी अभियानाला पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी अतिशय गांभीर्याने घेतले असून विधानसभेच्या अधिवेशनाचा समारोप झाल्यानंतर ताबडतोब सदस्यता नोंदणी कार्यशाळेला मार्गदर्शन करण्यासाठी मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब तसेच प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे हे हजर झाले असे श्री.दानवे यांनी सांगत सदस्यता नोंदणी अभियान कार्यशाळेची रूपरेषा स्पष्ट केली व जालना महानगर मध्ये जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी असे आवाहन पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले.

यावेळी महानगर जिल्हाध्यक्ष सतीष जाधव म्हणाले की, कोणीही भारतीय जनता पार्टीचा सदस्य होऊ शकतो यासाठी ८८ ०००० २०२४ या क्रमांकावर मिसकॉल करणे आवश्यक असून याद्वारे आलेल्या लिंक मध्ये नवीन सदस्याची माहिती भरावयाची आहे. अभियान जालना महानगरातील दहा मंडलामध्ये मोठ्या प्रमाणावर राबवण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना केले. जालना महानगरात प्रत्येक बुथवर जास्तीत जास्त सदस्यता नोंदणी कशी करता येईल, यासाठी सर्वांनी रचनात्मक नियोजन करावे व प्रत्येक बूथवर २०० सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट निश्चित ठेवावे, आपण आपल्या मंडळातील जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत असे त्यांनी सांगितले.यावेळी सोपान पेंढाकर, सिद्धिविनायक मुळे, सुनील भैया खरे, अमोल कारंजेकर, सुनील पवार यांच्यासह भाजपा महानगर मंडळ अध्यक्ष, नगरसेवक, मंडळ प्रभारी, पदाधिकारी, कार्यकर्ते, मोर्चाचे अध्यक्ष, प्रकोष्ठ संयोजक यांच्यासह आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# धनंजय मुंडेंनी माझ्या मतदारसंघात माझ्या विरोधात प्रचार केला म्हणून मी बीडला आलो

## जितेंद्र आव्हाड यांची मळमळ आणि सुडाचे राजकारण 'त्या' कॉल रेकॉर्डिंगमुळे उघड

## स्व.संतोष देशमुख यांच्या मृत्यूचे आव्हाडांना सोयरसुतक नाही, केवळ गलिच्छ राजकारण

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि बीड मधील एका तरुणाच ऑडिओ कॉल सध्या सोशल माध्यमातून व्हायरल होत आहे. धनंजय मुंडे हे माझ्या ठाण्यातील कळवा मुंब्रा मतदार संघात प्रचारासाठी आले होते. मात्र जितेंद्र आव्हाड आपली टिंगल टवाळी करण्यासाठी कधी तुमच्या मतदारसंघात आले नाही.. तुमचे धनंजय मुंडे मला पाडायसाठी मतदारसंघात आले होते.. तुम्ही मला विचारता तुम्ही धनंजय मुंडे बाबत का बोलता तर तुम्ही धनंजय मुंडे यांना विचारा जितेंद्र आव्हाड यांना पाडायला.. तुम्ही वंजारी.. मी वंजारी.... माझ्या मतदारसंघात येऊन म्हणता याला प्रचंड मताने हरवा... म्हणून मी बीडला येऊन धनंजय मुंडे च्या विरोधात बोलत आहे, अशी मळमळ जितेंद्र आव्हाड यांनी या ऑडिओ कॉल मधून बोलून दाखवली आहे.

मुळात स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मृत्यूशी जितेंद्र आव्हाड यांचे काहीही देणे घेणे दिसत नसून निवडणुकीत धनंजय मुंडे यांनी आव्हाड यांच्या विरोधात प्रचार केल्याच्या रागातून केवळ आव्हाड हे सुड बुध्दीने धनंजय मुंडेंना टार्गेट करून ओढून आणून त्यांचे नाव या प्रकरणाशी जोडण्याचा प्रयत्न करत गलिच्छ राजकारण साधत असल्याचे या ऑडिओ कॉल मुळे स्पष्ट होत आहे.

विधिमंडळातील भाषणात आणि बीडच्या मोर्चातील भाषणात देखील जितेंद्र आव्हाड यांना स्वर्गीय संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्यापेक्षा धनंजय मुंडे यांच्यावर वेगवेगळे आरोप करण्यातच जास्त रस असल्याचे स्पष्ट दिसून येते. बीड येथील मोर्चामध्ये वेगवेगळ्या समाजाचे लोक गोळा करा मुंडेला टार्गेट करू त्याचे मंत्रीपद घालू अशा आशयाचे आव्हाड यांचे व्हाट्सअप चॅट देखील याआधी व्हायरल झाले आहेत. नेहमीच वादग्रस्त वक्तव्य करून चर्चेत राहणारे जितेंद्र आव्हाड यांनी आता केवळ आणि केवळ धनंजय मुंडे यांची बदनामी करण्याचे गलिच्छ राजकारण या घटनेच्या आडून सुरू केले असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे.

# घाटनांदुर येथील सरपंचाने मांडला ग्रामपंचायतच्या द्वितीय वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त खर्चाचा लेखाजोखा

घाटनांदूर । प्रतिनिधी

येथील ग्रामपंचायतचे सरपंच महेश गारठे यांनी गेल्या वर्षीप्रमाणे त्यांच्या कार्यकाळास दोन वर्षपुर्ण झाल्याबद्दल द्वितीय वर्ष पूर्तीनिमित्त गावात केलेल्या विकास कामाचा व हिशोबाचा लेखाजोखा येथील भगतसिंग चौकात ग्रामस्थासमोर शनिवारी (ता.२८) जाहीररीत्या सादर केला.

गेल्या दोन वर्षापूर्वी घाटनांदूर ग्रामपंचायत निवडणुकीत लोकनियुक्त सरपंच महेश गारठे व त्यांच्या पॅनलचे सदस्य निवडून होते. यानंतर उपसरपंच व सर्व सदस्यांना व कर्मचाऱ्यास विश्वासात घेऊन पारदर्शक कारभारास सुरुवात केली. पाणी पुरवठ्यासह स्वच्छतेला प्राधान्य देऊन वेळ प्रसंगी पदरमोड करून टँकरने पाणी पुरवठा केला. तीन ठिकाणी अरो प्लांट बसविण्यात आले असून ग्रामस्थांना अल्प दरात शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे.तसेच गावातील सांडपाणी वाहून नाल्याची वेळोवेळी साफसफाई करून घरातील कचरा





साठवण्यासाठी प्रत्येक कुटुंबाला डस्टबीनचे वाटप केले. घण्टगाडीच्या माध्यमातून गल्लोगल्ली कचरा गोळा करून त्याची गावाच्या बाहेर विल्हेवाट लावली जात आहे. तसेच गावाच्या सुरक्षेसाठी चार लक्ष खर्च करून मुख्य चौका सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.ना. धनंजय मुंडे व ना. पंकजा मुंडे यांच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनेतून गावात पाच कोटी रुपयांचे विकास कामे सुरू असल्याची माहिती सरपंच गारठे दिली. सदरील विकास कामे दर्जावर विशेष लक्ष दिले जात आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवराम पिसाळ तर ग्रामविकास अधिकारी वाय ए शेळके, दत्ता जाधव, सुभाष चव्हाण ,प्रभू अरसुडे , देविदास काटे ,रंगनाथ गाढवे ,दिलीप पिसाळ ,पवन दरगड, विशाल अरसुडे, संगीता वैद्य, जयश्री गाढवे ,हैसाबाई मिसाळ, स्वाती कसबे, राजुबाई गोडबोले, चंद्रकला कुसळे ,विजय गोदाम, सलाम कुरेशी, प्रदीप वैद्य यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेना तालुकाप्रमुख यांच्या नेतृत्वात जयपूर सर्कलच्या शेकडो कार्यकर्त्यांचा प्रवेश



जालना । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील जयपूर सर्कलमधील मनसेचे नेते बाळासाहेब देशमुख यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी आज तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या नेतृत्वात शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे.

यावेळी तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी प्रवेश घेतलेल्या शेकडो कार्यकर्त्यांचा सत्कार करून पक्षात स्वागत केले.

महाराष्ट्राचे कार्यकुशल आणि धडाडीने निर्णय घेणारे मा.मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून परतुर-मंठा विधानसभा क्षेत्रातील विविध पक्षांतील शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे पक्षात नव्याने येणाऱ्या कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणात ओघ वाढला असून शेकडो कार्यकर्त्यांमुळे पक्षाला बळकटी मिळाल्याचे मत शिवसेनेचे तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी व्यक्त केले.

यावेळी शिवसेना पक्षाचे उपनेते आ.अर्जुन खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना मंठा तालुका प्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश सोहळा पार पडला यावेळी मनसे तालुका उपाध्यक्ष मंठा बाळासाहेब देशमुख यांच्या सह संतोष खवणे, महादेव मिसाळ, भगवान खंदारे,महेश वायाळ, प्रकाश राव देशमुख, नितेश देशमुख,अनंत ढाकरगे, प्रदीप टक्रास, प्रकाश मगर,बाबासाहेब दाकरगे, विशाल देशमुख, माणिक गायकवाड,लहू राठोड, दिपक देशमुख,अशोक बहिवाळ,विठ्ठल ढाकरगे, विकास देशमुख, योगेश देशमुख, पंकज देशमुख, प्रसाद देशमुख, विजय राठोड, सदाशिव ढाकरगे, प्रदीप राठोड, लखन देशमुख, नीलकंठ देशमुख, रवि देशमुख, कृष्णा देशमुख, शिवाजीराव खवने, रमेश बापू खवणे,सुरेश खवणें, विजय वायाळ, महादेव खवणे, हनुमान देशमुख, प्रणव निर्वळ, गणेश खंदारे, विष्णुपंत देशमुख, दामू घुगे, नारायण लोमटे, विशाल ससाणे, गौतम घुगे,उत्तमराव क्रहाले,यावेळी बाळासाहेब पंडितराव देशमुख यांना उपतालुका प्रमुख मंठा पदी निवड करण्यात आली यावेळी शिवसेना तालुका प्रमुख मंठा उदय दादा बोराडे, उप तालुका प्रमुख राम वरकड, दलीत आघाडी तालुका प्रमुख दिलीप दादा हिवाळे, युवासेना तालुका प्रमुख दिपक गायकवाड, दलीत आघाडी उपजिल्हा प्रमुख नितीन मोरे, युवासेना शहर प्रमुख अँड राजेश खरात, विनोद प्रधान, सतीश वायाळ, माऊली वायाळ, पिराजी पालवे, संतोष देवकर आदी पदाधिकारी उपस्थित होते

पान ६ वरून...

## मारफळा विद्यालयाचे वरिष्ठ

समितीचे सदस्य नारायणराव डरपे, शाळेचे मुख्याध्यापक बी.टी.पवार, शिवाजीराव कुटे यांच्यासह निरोप समारंभाला पंचक्रोषीतील मान्यवर व शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी युवा नेते रणवीरराजे पंडित यांच्या हस्ते संस्थेच्या वतीने सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक विठ्ठलराव बाबर यांचा सपत्नीक यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना रणवीरराजे म्हणाले की, बाबर सर यांनी त्यांच्या कार्यकाळात प्रामाणिक सेवा दिली आज ते सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचा सेवापुर्ती समारंभ ही त्यांच्या कार्याची पावती आहे. असे गौरवोद्गार याप्रसंगी त्यांनी व्यक्त करुन पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन भागवत ठोंबरे तर उपस्थितांचे शेख सर यांनी आभार व्यक्त केले. यावेळी माध्यामिक विद्यालय व वरिष्ठ महाविद्यालय, मारफळा चे सर्व शिक्षक, पालक वर्ग तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुरेश धस यांचा आणखी एक

धस यांनी बीड येथील मोर्चामध्ये बोलताना लोढा कुटुंबीयाबाबत वक्तव्य करत धनंजय मुंडे यांनी त्यांच्या अनंत प्रतिष्ठान या संस्थेला जमीन देण्यासाठी स्वतःला ट्रस्टचे अध्यक्ष करा वगैरे अटी घातल्या अशा स्वरूपाचे धादांत खोटे आरोप केले होते.

मात्र आमदार सुरेश धस यांनी आमच्याशी कुठलीही चर्चा न करता आमच्या कुटुंबाचं नाव घेऊन धनंजय मुंडे यांच्यावर खोटे व चुकीचे आरोप केले आहेत. जेव्हा आम्ही धनंजय मुंडे यांना भेटलो तेव्हा त्यांनी आम्हाला मदतच केली असे डॉक्टर महेंद्र लोढा यांनी म्हटले आहे.दरम्यान तोंडाला येईल ते बोलत सुटलेले आमदार सुरेश धस हे याआधीही परळीतील व्यापारी अमोल डुबे यांच्या प्रकरणात तोंडघशी पडलेले आहेत. परळीच्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शिरसाळा येथील व्यापारी संकुलाच्या बाबतीत देखील संपूर्ण कागदपत्रे पुरावेच बाहेर आल्याने त्याही प्रकरणात सुरेश धस हे धादांत खोटारडे आरोप करतात हे उघडकीस आले. तर अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्याबाबत केलेल्या बेताल वक्तव्यावरून देखील सुरेश धस अडचणीत येण्याची शक्यता आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्था

यांच्या आदेशानुसार बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने काल रविवार, दि.२९ डिसेंबर रोजी बीड जिल्हा शिवसेनेची बैठक दुपारी बारा वाजता हॉटेल ग्रँड यशोदा येथे संपन्न झाली.

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात राज्याला प्रगतीपथावर नेले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसह विविध योजना राबवून महिलांना स्वावलंबी करण्याचा प्रयत्न शिंदे यांच्या कार्यकाळात झाला. मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी केलेल्या उल्लेखनिय कामामुळे विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला मोठे यश मिळाले असून राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आली. आता राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देखील शिवसेनेची सत्ता यावी, या दृष्टीने शिवसेना तयारीला लागली असून मजबुतीने पुढे जाणार आहे. बीड जिल्ह्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी पूर्ण तयारीने कामाला लागा असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी व्यक्त केले. दरम्यान यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात प्रभाग निहाय गण, गटनिहाय नियोजन व चर्चाझाली. याप्रसंगी बीड जिल्ह्यातील शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना व सर्व अंगीकृत संघटनेचे सर्व पदाधिकारी आजी-माजी लोकप्रतिनिधी व शिवसैनिकांनी उपस्थित होते.

# वातावरण बदलामुळे बंद असलेली सीसीआय कापूस खरेदी आजपासून पुन्हा सुरू -गुंदेकर

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील कापूस खरेदी वातावरण बदलामुळे बंद होती. अवकाळी पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला असल्याने बीड तालुक्यातील ३० डिसेंबर पर्यंत कापूस खरेदी सीसीआय कडून थांबविली होती. मात्र आता ही कापूस खरेदी पुन्हा सुरू करण्यात येणार आल्याची माहिती धनंजय गुंदेकर, संचालक, छत्रपती श्री शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समिती, बीड यांनी दिली आहे.



### अशी असेल आठवड्यातील दिवसनिहाय कापूस खरेदी

सोमवार - सिद्धी ॲग्रो, बीड
मंगळवार - श्री नगद नारायण कॉटन, साक्षाळपिंप्री
बुधवार - सिद्धी ॲग्रो, बीड
गुरुवार - नर्मदादेवी कॉटस्पिन, मैंदा
शुक्रवार - श्री हरी ट्रेडिंग कंपनी, वडवणी
शनिवार, रविवार - खरेदी बंद

सीसीआय कडून हमीभाव ७४२१ प्रती क्विंटल प्रमाणे कापूस खरेदी ही बीड तालुक्यात ३ ठिकाणी ४ दिवस तर वडवणी तालुक्यात १ ठिकाणी १ दिवस करण्यात येत आहे. यामध्ये प्रत्येक सोमवारी व बुधवारी सिद्धी ॲग्रो बीड, मंगळवारी साक्षाळपिंप्री येथील श्री नगद नारायण कॉटन, गुरुवारी मैंदा येथील नर्मदादेवी कॉटस्पिन व शुक्रवारी वडवणी येथील श्री हरी ट्रेडिंग कंपनी यांच्याकडे खरेदी सुरू असल्याचे संचालक धनंजय गुंदेकर यांनी म्हंटले आहे.

# तुटपुंज्या मजुरीवर विदर्भ व परराज्यातील मजूरांकडून करून घेतली जातात वेठबिगारीचे कामे

## परराज्यातील मजुरांचा दोन दिवसापासून ग्रामीण पोलीस ठाण्यात ठिय्या

## पोलीसांकडून वेठबिगारीचा गुन्हा दाखल करण्यास दोन दिवसांपासून टाळाटाळ

ज्योतीराम पांढरपोटे/ माजलगाव

महाराष्ट्रातील विदर्भ व मध्य प्रदेशातील काही जिल्ह्यातून दलालामार्फत स्त्री-पुरुषांना जास्त पैशाचे आमीष दाखवून मोलमजुरी करण्यासाठी माजलगाव तालुक्यात आणण्यात आले होते.मागील अनेक दिवसांपासून या मजुरांचे संबंधित व्यक्तीकडून शोषण करून वेठबिगारीस मजबूर केले जात असल्याची माहिती उघड झाली.याबाबत सामाजिक कार्यकर्त्यासत्यभामा सौंदरमल यांनी अनेक मजुरांनाग्रामीण पोलीस ठाण्यातदोन दिवसापासूनआणले असता पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याचे सांगितले जात आहे.

विदर्भातील अमरावती व भंडारा त्याचबरोबर मध्य प्रदेश मधील छिंदवाडा येथील मजुरी करणाऱ्या कुटुंबास जास्तीची मजुरी देण्याची लालच दाखवून तालुक्यातील शिंदेवाडी , देवखेडा, मालीपारगाव यासह काही गावात गुऱ्हाळात मजुरी करण्याची सांगत आणण्यात आले होते.मात्र या मजुरांना गुऱ्हाळात काम देण्याऐवजी शेतातील कापूस वेचणीचे काम करून घेत त्यांना तुटपुंजी मजुरी देत त्यांच्याकडून वेठबिगारी करण्याचे काम करून घेतले गेले. या मजुरांना एका दलालामार्फत आणण्यात आले होते. संबंधित दलालाने काही मजुरांना दोन महिन्यापूर्वी,काही मजुरांना एक महिन्यापूर्वी व काही मजुरांना पंधरा दिवसांपूर्वी या ठिकाणी आणले होते. यातील काही जण पळून देखील गेल्याचे सांगितले जात आहे.याबाबत सामाजिक कार्यकर्ते सत्यभामा सौंदरमल यांना याची माहिती मिळाल्यावर त्यांनी दि २८ डिसेंबर शनिवार रोजी सकाळी या मजुरांची भेट घेतली.व त्यांची सर्व माहिती करून घेतल्यानंतर त्यांनी शनिवारी दुपारी पाच महिला,दहा पुरुष व एक नऊ महिन्याचा बालकास ग्रामीण पोलीस ठाण्यात घेऊन येत येथील पोलीस निरीक्षक बालक कोळी यांना घडलेल्या सर्व प्रकारची माहिती दिली.परंतु बालक कोळी यांनी सदर प्रकाराबाबत गांभीर्याने घेतले नाही व वेठबिगारी चा गुन्हा दाखल करून घेतला नसल्याचा आरोप देखील सामाजिक कार्यकर्त्या सत्यभामा सौंदरमल यांनी केला आहे.

सदर मजूर दोन दिवसापासून ग्रामीण पोलीस ठाण्यासमोर ठाण मांडून बसलेले आहेत.दोन दिवस उलटले असताना देखील पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेण्यास टाळाटाळ का करत आहे याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.



दोन दिवसापासून आम्ही या सर्व मजुरांना घेऊन ग्रामीण पोलीस ठाण्यासमोर बसलेलो आहोत.याबाबत पोलिसांना मजुरांना घेऊन येणाऱ्या सुनील अलझेंडे नामक व्यक्ती बाबत सर्व माहिती दिली असताना देखील पोलिसांकडून दोन दिवसापासून वेटबिघारीचा गुन्हा दाखल केला नाही . सध्या पोलीस ठाण्यासमोर १५ मजूर आलेले असून अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात मजूर असल्याचे या मजुरांकडून सांगितले जात आहे.या मजुरांकडे सर्व कागदपत्रे व आधार कार्डचा पुरावा उपलब्ध आहे.

- सत्यभामा सौंदरमल , सामाजिक कार्यकर्त्या

राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
सोमवार दि.३० डिसेंबर २०२४
४

# अडचणीत असलेल्या बांगलादेशाला मदतीचा हात, मोठ्या प्रमाणात तांदळाची निर्यात

बांगलादेशातील सत्तापालटानंतर शेख हसीना यांनी ५ ऑगस्ट रोजी आपला देश सोडला आणि भारतात आश्रय घेतला. तेव्हापासून बांगलादेशमध्ये राजकीय गोंधळ सुरुच आहे. दरम्यान, बांगलादेशात हिंदूंवरील अत्याचार, मंदिरांची विध्वंस, जाळपोळ अशा अनेक बातम्या समोर आल्या आहेत. मात्र, अशा हिंसेच्या आगीत पेटलेल्या बांगलादेशला भारताने पुन्हा एकदा मदतीचा हात दिला आहे. आर्थिक संकटाचा सामना करत असलेल्या बांगलादेशला भारतातून २७ हजार टन तांदूळ पाठवण्यात आला आहे. भारतातून बांगलादेशला २ लाख टन तांदूळ निर्यात करण्यात येणार आहे. बांगलादेशातील अंतरिम सरकारने भारतातून तांदूळ आयात करण्यास सुरुवात केली आहे. बांगलादेशच्या अधिकाऱ्यांनी याबाबतची माहिती दिली आहे. तांदळाची ही पहिली खेप चितगाव बंदरातून बांगलादेशात पोहोचली आहे. भारताकडून २००,००० टन तांदूळ खरेदी करणे हा कराराचा हा भाग आहे. बांगलादेशमध्ये सध्या तांदळाची कमतरता नाही, परंतु अलीकडील गंभीर पूर संकटाच्या पार्श्वभूमीवर सरकारने संभाव्य



आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी तांदळाची उपलब्धता वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळं तांदळाची आयात करण्याचा निर्णय घेतला आहे.

शून्य आयात शुल्कावर तांदूळ पाठवला जात आहे : २००,००० टन तांदळाच्या आयातीबरोबरच, बांगलादेशचे अंतरिम सरकार निविदाद्वारे १००,००० टन तांदूळ देखील आयात करेल. भारतातून आणखी तांदूळ आयात करण्याची सरकारची योजना असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. दरम्यान, देशातील तांदळाच्या किंमतीत स्थिरता आणण्यासाठी त्याच्या आयातीवरील सर्व करही मागे घेण्यात आले आहेत. म्हणजे बांगलादेश भारताकडून शून्य आयात शुल्कावर तांदूळ आयात करत आहे. बांगलादेशातील भारताचे उच्चायुक्त प्रणय कुमार वर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारताने आधीच बांगलादेशच्या अंतरिम सरकारसोबत काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. बांगलादेशात ५ ऑगस्टच्या गोंधळात टाकलेल्या बदलांनंतरही मला वाटते की आम्ही बांगलादेशच्या अंतरिम सरकारशी पूर्ण प्रामाणिकपणे चर्चा केली आहे.

बांगलादेशी प्रसारमाध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, बांगलादेशचा सध्या आयातीवरील खर्च वाढला आहे. मात्र, दुसरीकडे त्या तुलनेत निर्यातीतून मिळणारे उत्पन्न वाढलेले नाही. त्यामुळे व्यापार तूट सातत्याने वाढत आहे. आयातीवर अधिक डॉलर खर्च करावे लागत आहे, निर्यातीच्या तुलनेत परकीय चलन मिळालेले नाही, त्यामुळे परकीय चलनाचा साठा कमी होत आहे. त्यामुळं सध्या बांगलादेश मोठ्या प्रमाणात आर्थिक संकटात सापडला आहे.

# पालकाच्या या जाती देतील भरघोस नफा



शेतकरी चांगला नफा मिळविण्यासाठी पालकाची लागवड करू शकतात. पालकाचे बरेच प्रकार आहेत. भारतात पालकाची लागवड रब्बी, खरीप आणि उन्हाळी या तीनही पीक हंगामामध्ये केली जाते. यासाठी शेतात पाण्याचा निचरा करण्याची चांगली व्यवस्था असावी. तसेच हलक्या चिकणमाती जमिनीत पालकाच्या पानांचे चांगले उत्पादन मिळते.

या गोष्टींकडे विशेष लक्ष द्या : पेरणीपूर्वी बियाण्यास २ ग्रॅम कॅप्टन प्रति किलोग्रॅमची प्रक्रिया करावी, जेणेकरून उत्पादन चांगले मिळेल. पेरणीसाठी ओळीपासून ओळीपर्यंत २५-३० सेंमी आणि रोपापासून रोपापर्यंत ७-१० सेमी अंतर ठेवावे. पालक लागवडीसाठी, हवामान आणि मातीनुसार जास्त उत्पादन देणारे सुधारित वाण निवडू शकतात. देशी पालक :देशी पालक बाजारात चांगल्या दराने विकला जातो. देशी पालकाची पाने लहान, गुळगुळीत आणि अंडाकृती असतात. ते खूप लवकर तयार होते, म्हणून बहुतांश शेतकरी त्याची लागवड करतात.विलायती पालक : परदेशी पालकाच्या बिया गोल आणि काटेरी असतात. डोंगराळ आणि थंड ठिकाणी काटेरी बियाणे वाढवणे अधिक फायदेशीर आहे. मैदानी भागातही गोल जातींची लागवड केली जाते.ऑल ग्रीन :हिरव्या पालेभाज्या पालकाची जात १५ ते २० दिवसांत तयार होते.

एकदा पेरणी केल्यानंतर ते सहा ते सात वेळा पाने कापू शकते. ही वाण निःसंशयपणे जास्त उत्पादन देते, परंतु हिवाळ्यात लागवड केल्यास ७० दिवसांत बियाणे आणि पाने तयार होतात.

पुसा हरित : वर्षभराचा खप भागवण्यासाठी अनेक शेतकरी पुसा हरितची लागवड करतात. त्याची वाढ सरळ वरच्या बाजूस असते आणि त्याची पाने गडद हिरवी आणि आकाराने मोठी असतात. क्षारयुक्त जमिनीवर त्याची लागवड करण्याचे अनेक फायदे आहेत.

# जनावरांच्या आवडीचा पौष्टिक चारा ‘लसूण घास’

द्विदलवर्गीय, जनावरांच्या आवडीचा पौष्टिक चारा पीक म्हणजे ‘लसूण घास’.या चाऱ्याला इंग्रजीत ‘ल्युसर्न’ किंवा ‘अल्फाल्फा’ या नावाने सुद्धा ओळखतात.

लसूण घास चाऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्रथिने, काष्ठमय तंतू, कर्बोदके आणि सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळतात. या चाऱ्यामध्ये १८ ते २० टक्के प्रथिने, २.० टक्के स्निग्धांश, २५ टक्के तंतू, २९ टक्के कर्बोदके, सूक्ष्म अन्नद्रव्ये, उपयुक्त आम्ले तसेच अ आणि ड जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे या चारा पिकाला विशेष महत्व आहे. हे पीक तीन वर्षापर्यंत शेतात टिकते. दरवर्षी १२ ते १५ कापण्या मिळतात ज्यातून सरासरी १०० ते १२५ टन हेक्टरी हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळते. या चारा पिकाच्या लागवडीतील महत्वाचे मुद्दे जाणून घेऊ या. या चारा पिकाला मध्यम ते भारी, चांगला निचरा होणारी, तसेच सामू ७.५ ते ८ दरम्यान असणारी जमीन चांगली मानवते. ऑक्टोबर- नोव्हेंबर हा कालावधी लागवडीसाठी योग्य समजला जातो. हे पीक जमिनीत तीन वर्षांपर्यंत टिकणारे असल्यामुळे जमिनीची चांगली मशागत करावी लागते. या पिकास भरपूर प्रमाणात भरखते व वरखते देणे गरजेचे आहे. मशागतीच्या वेळी हेक्टरी १५ ते २० टन शेणखत जमिनीत मिसळावे. पेरणीपूर्वी २० किलो नत्र, १०० किलो स्फुरद व ५० किलो पालाश या रासायनिक खतांची प्रति हेक्टरी मात्रा द्यावी. त्यानंतर दर तीन ते चार कापण्यांनंतर हेक्टरी ५० किलो स्फुरद खताची मात्रा द्यावी. लागवडीसाठी आरएल-८८, आनंद-२, आनंद-३, को-१ सुधारित जातींची निवड करावी. ओळीत पेरणी केल्याने खते देणे सोपे जाते. हात कोळप्याने आंतरमशागत करता येते. ओळीत बियाणे पेरणी करण्या अगोदर जमिनीमध्ये वाफे तयार करून घ्यावेत, जमिनीच्या उतारानुसार साधारणपणे ३ ते ५ मीटर रुंद व १० मीटर लांबीचे वाफे तयार करावेत. त्यानंतर एक फूट अंतरावर काकऱ्या पाडाव्यात. दोन ओळींत एक फूट अंतर ठेवून ओळीत बियाणे पेरणी केली असता हेक्टरी २५ किलो एवढेच बी पुरेसे होते. ओळीतील पेरणीमुळे हातकोळपणी यंत्राने कमी खर्चात तणनियंत्रण करता येते. पेरणीपूर्वी १० किलो बियाण्यास २५० ग्रॅम रायझोबियमची बीजप्रक्रिया करावी. बी पेरल्यानंतर पहिले पाणी हळुवार द्यावे. जमिनीच्या मगदुरानुसार पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. तुषार सिंचनाने पाणी देणे फायद्याचे ठरते. लसूण घासाची पहिली कापणी पेरणीनंतर ५० ते ५५ दिवसांनी करावी. पहिल्या कापणीनंतर दर २२ ते २५ दिवसांनी कापणी करावी. कापणी जमिनीपासून ५ ते ६ सें.मी. उंचीवर करावी. कापणी करताना पीक उपटून येणार नाही याची काळजी घ्यावी. शेवटच्या कापणीनंतर पिकाला ५ ते ६ दिवस पाण्याचा ताण देऊन खुरपणी करावी. पाणी देण्यापूर्वी हेक्टरी १०० किलो स्फुरदची मात्रा द्यावी. पाणी देऊन पीक बियाण्यासाठी सोडावे. लसूण घासाचे पीक ५० टक्के फुलोऱ्यात आल्यानंतर २ टक्के डाय अमोनियम फॉस्फेटची फवारणी करावी. त्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने पुन्हा २ टक्के डाय अमोनियम फॉस्फेटची दुसरी फवारणी करावी. यामुळे बियाणे उत्पादनात २० टक्के वाढ होते.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८०३ : ला ब्रिटन च्या इस्ट इंडिया कंपनी ने दिल्ली,आग्रा आणि भरूच वर आपले नियंत्रण सुरु केले.
१९०६ : ऑल इंडिया मुस्लिम लीगची ढाक्का येथे स्थापना. या घटनेतच भारताच्या फाळणीची बीजे रोवली गेली.
१९२४ : एडविन हबलने आकाशगंगेखेरीज इतर दीर्घिकाही अस्तित्वात असल्याचे जाहीर केले.
१९४३ : सुभाषचंद्र बोस यांनी पोर्ट ब्लेअर येथे भारतीय स्वातंत्र्याचा झेंडा फडकविला
१९७९ : ला पश्चिम आफ्रिकेतील एका देशाने संविधानाचा स्विकार केला.


### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

३९ : टायटस - रोमन सम्राट (मृत्यू: १३ सप्टेंबर ८१)
१८६५ : रुडयार्ड किपलिंग - नोबेल पारितोषिकविजेते ब्रिटिश लेखक (मृत्यू: १८ जानेवारी १९३६)
१८७९ : वेंकटरमण अय्यर तथा योगी रमण महर्षी - भारतीय तत्त्ववेत्ते (मृत्यू: १४ एप्रिल १९५०)
१८८७ : डॉ. कन्हैय्यालाल मुन्शी - मुंबईचे पहिले गृहमंत्री, हैदराबाद संस्थानात भारत सरकारचे एंजट जनरल, नामवंत साहित्यिक आणि ‘भारतीय विद्याभवन’चे संस्थापक (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९७१)
१९०२ : डॉ. रघू वीरा - भाषाशास्त्रज्ञ, जनसंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष, घटनासमितीचे सदस्य, राज्यसभा खासदार, वैदिक संस्कृत, तिबेटी, चिनी, मंगोलियन इत्यादी भाषांचे जाणकार (मृत्यू: १४ मे १९६३)
१९२३ : भारतीय शैक्षणिक व राजकारणी प्रकाश केर शास्त्री यांचा जन्म. (मृत्यू: २३ नोव्हेंबर १९७७)
१९३४ : हबल स्पेस टेलिस्कोप चे सहनिर्माते जॉन एन. बाहॅकल यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑगस्ट २००५)
१९३५ : प्रथम भारतीय चेस मास्टर मॅन्युअल आरोन यांचा जन्म.
१९५० : सी + + प्रोग्रामिंग भाषाचे जनक बर्जनी स्ट्रास्ट्रुप यांचा जन्म.
१९५० : भारतीय समज सेवक डॉ. हनुमाप्पा सुदर्शन यांचा जन्म.
१९८३ : इन्स्टाग्रामचे सहसंस्थापक केविन सिस्ट्रम यांचा जन्म.
१९८९ : भारतीय क्रिकेटपटू सौरभ तिवारी चा जन्म.
१९९२ : भारताच्या युवा बॅडमिंटन खेळाडू सौरभ वर्मा यांचा जन्म.
१९९४ : भारताच्या आर्चर आणि अर्जुन पुरस्कार विजेता रजत चौहान चा जन्म

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६९१ : रॉबर्ट बॉईल - आयरिश रसायनशास्त्रज्ञ (जन्म: २५ जानेवारी १६२७)
१९४४ : रोमें रोलाँ - साहित्यातील नोबेल पारितोषिक (१९१५) विजेते फ्रेन्च लेखक, नाटककार व संगीत समीक्षक (जन्म: २९ जानेवारी १८६६)
१९७१ : डॉ. विक्रम साराभाई - भारतीय भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १२ ऑगस्ट १९१९)
१९७४ : आचार्य शंकरराव देव - गांधीवादी कार्यकर्ते.
१९८२ : दत्ता उर्फ दादा धर्माधिकारी - चित्रपट अभिनेते व दिग्दर्शक (सतीची पुण्याई, धाकटी मेहुणी, भक्त पुंडलिक, नसती उठाठेव, मुझे सीने से लगा लो, सतीचे वाण, थांब लक्ष्मी कुंकू लावते, वैशाख वणवा, सुभद्रा हरण, क्षण आला भाग्याचा, सप्तपदी इ. अनेक चित्रपट) (जन्म: २ डिसेंबर १९१३ कोल्हापूर)
१९८७ : दत्ता नाईक ऊर्फ ’एन. दत्ता’ - संगीतकार.
१९९० : भारतीय लेखक, कवी आणि समीक्षक रघुवीर सहाय यांचे निधन. (जन्म: ९ डिसेंबर १९२९)
२००६ : इराकी हुकूमशहा व इराकचे ५ वे अध्यक्ष सद्दाम हुसेन यांना फाशी (जन्म: २८ एप्रिल १९३७)
२०१५ : भारतीय कवी, नाटककार, आणि अनुवादक मंगेश

# बंदिस्त शेळी पालनाचे फायदे



शेळीपालन हा शेती पूरक व्यवसाय असून कमी भांडवल व कमी जागेत हा व्यवसाय करता येण्यासारखा आहे. ज्यांना इतर जनावरांपेक्षा जसे की गाय, म्हैस या पेक्षा खूप कमी प्रमाणात खाद्य लागते. जर आपण विचार केला तर एका गाईला लागणाऱ्या खाद्यामध्ये दहा शेळया जगू शकतात. त्यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी हा व्यवसाय अत्यंत फायदेशीर आहे. शेळीपालनामध्ये बंदिस्त शेळीपालन हा शेळीपालनाचा एक प्रकार फार महत्त्वाचा आहे. यामध्ये शेळ्यांना त्यांना लागणारा चारा त्यांच्या गोठ्यामध्ये पुरवला जातो. या लेखात आपण बंदिस्त शेळी पालनाचे फायदे जाणून घेणार आहोत.

बंदिस्त शेळी पालनाचे फायदे

शेळी आकाराने लहान असल्यामुळे जागा कमी लागते. त्यामुळे जागेचा व बांधकामास खर्च कमी येतो. शेळी हा प्राणी कळपात राहत असल्यामुळे कळपाची वाढ झपाट्याने होते व लहान कळप घरातील स्त्रिया व मुले सहजपणे सांभाळू शकतात. त्यामुळे मजुरीचा खर्च वाचतो. शेळी हा प्राणी अत्यंत काटक आहे व बंदिस्त जागेत शास्त्रीय पद्धतीने त्याचे संगोपन केल्यास रोगराईचे प्रमाण कमी होते. औषध उपचारावरील खर्च कमी होतो. मरतुक कमी होते व त्याचमुळे फायद्यात वाढ होते. शेळ्यांसाठी कुठल्याही प्रकारची किमती खाद्य लागत नाही. शेतातील काही टाकाऊ पदार्थांपासून शेळीचे खाद्य तयार करता येते. त्यामुळे खाद्याचा खर्च कमी होतो. शेळ्या चारायला सोडल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होते. तसेच जंगलातील झाडेझुडपे यांचे नुकसान होते. तसेच शेळीला जखम व्हायची शक्यताही वाढते. हे सगळे नुकसान टाळण्यासाठी शिवरायांचे बंदिस्त शेळीपालन हा प्रकार फायदेशीर आहे. आपल्या देशांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी वेगळ्या प्रकारचे हवामान असल्यामुळे गोठा बांधण्याच्या ठिकाणी त्या त्या भागातील हवामान पोटातील वायू विसर्जनाचा विचार करून बांधकामाच्या साहित्य निवडावे. बांधकाम करताना वापरासाठी स्थानिक व सर्वसाधारण उपलब्ध असलेल्या साहित्याची निवड करावी.शेतातील टाकाऊ पदार्थ, गव्हाचे काड किंवा भाताचे काड, ज्वारी बाजरीचे कांड, सिमेंट पत्रे, लोखंडी पत्रे यांचा वापर करावा. सर्वसाधारणपणे सूर्यप्रकाश व पावसापासून संरक्षण होईल अशा प्रकारचे छप्पर निवडावे. गोठा पूर्व पश्चिम दिशेत बांधावा. गोठ्यामध्ये शुद्ध हवा सतत खेळती राहावी. त्यामुळे गोठ्यातील उष्णता, कार्बन वायू, धूळ, आद्रता गोठा बाहेर पडण्यास मदत होते. म्हणूनच गोठा बांधतांना त्याच्या मध्यावर उंची जितकी जास्त करता येईल तितकी ठेवावी. सर्वसाधारणपणे १५ ते १८ फूट उंची ठेवावी. शेळ्यांना सतत कोरडी जमीन उपलब्ध होईल याकडे लक्ष देण्यात यावे. तसेच मलमूत्र स्वच्छ करता येण्याजोगी जमीन ठेवावे. व्यायामासाठी शेळ्यांना सर्वसाधारणपणे तेवढ्याच जागेची आवश्यकता असते. ही जागा गोठ्याच्या एका बाहेरच्या बाजूला ठेवावी. त्यावर छप्पर बांधायची गरज नाही. गोठ्याच्या अवतीभवती सावलीसाठी मोठी झाडे लावावीत. खाद्य देण्यासाठी एका बाजूला लाकडी फळ्यांचा वापर करून करून गव्हाण तयार करावे. गव्हाणामध्ये शेळ्या आत जाऊन खाद्याची नासाडी करू नये म्हणून आडव्या बांबूचा उपयोग करावा. दुसऱ्या बाजूला जवळपास तीन फूट उंचीवर हिरवा चारा बांधावा.

अशी व्यवस्था केल्यास शेळ्यांच्या नैसर्गिक सवयीप्रमाणे त्यांना हिरवा चारा खायला मिळून त्यांना मानसिक समाधान लाभते. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था शक्यतो बाहेरील मोकळ्या जागेतच करावी. शक्य असल्यास बोकड व करडे यासाठी वेगळा गोठा बांधावा. बोकडांचा गोठा मुक्त गोटा पासून लांब अंतरावर बांधावा. जेणेकरून शेळीच्या दुधास येणारा विशिष्ट वास थांबवता येईल. हिरवा चारा देण्यासाठी दुसऱ्या पद्धतीनुसार जमिनीपासून तीन फुटांवर लाकडाचा उपयोग करून रॅक तयार करावेत. ओला चारा टाकण्यात यावा. त्यात दोन इंसा मधून आतील चारा बाहेर डोकावेल व शेळ्या दोन पायांवर उभे राहून चारा खातील अशा प्रकारचे लाकडी पिंजरे लावल्यानंतर शेळ्यांना त्यांच्या नैसर्गिक सवयीप्रमाणे खाद्य खाण्यास पोषक वातावरण निर्माण होईल. बंदिस्त जागेमध्ये शेळ्यांची वेगवेगळ्या प्रकारात विभागणी करता येते त्यामुळे शेळ्यांना वयोमानाप्रमाणे खाद्य देता येईल व खाद्याची नासाडी होणार नाही.

# विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी हाच प्रश्नमंजुषा स्पर्धेचा उद्देश -रणवीर पंडित

## प्रश्नमंजुषा स्पर्धेत शिवशारदा प्रथम, शारदा विद्यामंदिर द्वितीय तर जयभवानी तृतीय





गेवराई । प्रतिनिधी

**जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्रीडा आणि शैक्षणिक उपक्रम राबविले जात असून प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडेल असा विश्वास शारदा स्पोर्ट्स ॲकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी व्यक्त केला तर शारदा ज्ञानोस्तवातील प्रश्नमंजुषा स्पर्धा**

अद्वितीय स्पर्धा असून महत्त्वाची आहे. या स्पर्धेतून स्वत:चे मोजमाप करुन येणाऱ्या काळात स्पर्धा परिक्षेत हे विद्यार्थी यशस्वी होऊन प्रशासनात जातील असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते ॲड. सुभाष निकम यांनी व्यक्त केला. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत शारदा ज्ञानोत्सवामध्ये प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

प्रश्नमंजुषा स्पर्धेत शिवशारदा प्रथम, शारदा विद्यामंदिर द्वितीय तर जयभवानी तृतीय क्रमांक पटकावला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके वितरित करण्यात आली.

शारदा स्पोर्ट्स ॲकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित शारदा ज्ञानोस्तव अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. रविवार दिनांक २९ डिसेंबर रोजी गेवराई येथील र.भ. अट्टल महाविद्यालयाच्या गोदावरी सभागृहात प्रश्नमंजुषा स्पर्धेचे उद्घाटन रणवीर अमरसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते ॲड. सुभाष निकम, नगरसेवक शाम येवले यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रश्नमंजुषा स्पर्धेत शिवशारदा प्रथम, शारदा विद्यामंदिर द्वितीय तर जयभवानी तृतीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत संस्थेच्या आठरा शाळेचे विद्यार्थी गट सहभागी झाले होते.

आंतीम फेरीत जयभवानी माध्यमिक विद्यालय शिवाजीनगर गढीचे विद्यार्थी दिपक मोटे, श्रावणी वाघमारे. माध्यमिक विद्यालय सिरसदेवीचे विद्यार्थी अदिती गाडे, ऋषिकेश कोकणे. माध्यमिक विद्यालय मारफाळाचे विद्यार्थी आतेश पवार, सुमित राठोड. माध्यमिक विद्यालय घोगस पारगावचे विद्यार्थी प्राची गर्कळ, आयुष सांगळे. शिवशारदा पब्लिक स्कूल शिवाजीनगर गढीचे विद्यार्थी आर्या नरसाळे, यशराज सोलाट तर शारदा विद्या मंदिर गेवराईचे विद्यार्थी जोशी अपील, सुश्वरा चव्हाण उतरले. त्यामध्ये शिवशारदा पब्लिक स्कूल शिवाजीनगर गढीच्या विद्यार्थ्यांनी प्रथम, शारदा विद्यामंदिर गेवराईच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय तर जयभवानी माध्यमिक विद्यालय शिवाजीनगर गढीच्या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक पटकावला. सर्व विजेत्यांना उपस्थित मान्यवर ॲड सुभाष निकम, आयोजक रणवीर पंडित, पत्रकार विनोद पौळ, सामाजिक कार्यकर्ते अक्षय पवार, जयसिंग माने यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके वितरित करण्यात आली. कार्यक्रम व स्पर्धेचे सूत्रसंचालन दादाराव काकडे, सुनील चाळक यांनी केले तर उपस्थितांचे आभार मुख्याध्यापक मुरलीधर पवार यांनी मानले. स्पर्धेचे तांत्रिक संचालन सदानंद कुलकर्णी, पोपट सातपुते, शेख ताहेर, अमर जाधव, सतिश मस्के यांनी केले. यावेळी जयभवानी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, प्रा.काशिनाथ गोगुले, मुख्याध्यापक अशोक तौर, भक्तराज पौळ, रणजित सानप, बबन पवार, किशोर पंडित, उदय पाठक, भागवत राऊत, कल्याण कोकाटे, विश्वाभंर पवार यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी आणि स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शेतकऱ्याचा मुलगा चार्टर्ड अकाउंटंट बनून देशभरात आदर्श ठरला

आष्टी। प्रतिनिधी

सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या सौरभ सतीश जाधव यांनी चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षेत यश संपादन करून आष्टी व पंचक्रोशीचा लौकिक वाढवला आहे. पुण्यातील सर परशुराम महाविद्यालयात शिक्षण घेतलेल्या सौरभने आपल्या जिद्द, मेहनत, आणि चिकाटीच्या जोरावर हे कठीण आव्हान पेलले आहे. सौरभ जाधव यांनी जगातील कठीण मानल्या जाणाऱ्या सीए परीक्षेत दोन्ही ग्रुप यशस्वीरीत्या पास केले. अत्यंत साध्या परिस्थितीत शिक्षण घेतलेल्या सौरभने आपल्या मेहनतीने आणि कष्टाने कुटुंबाचे तसेच गावाचे नाव मोठे केले आहे. त्यांच्या यशामुळे पंचक्रोशीतील तरुणांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सौरभच्या सन्मानार्थ आष्टीत आयोजित सत्कार सोहळ्यात सौरभ चे वडील सतिश जाधव, समाजसेवक अशोक अण्णा पोकळे, सिध्दीविनायक उद्योग समूहाचे मालक रमेश भोगाडे, डॉ. सखाराम वाढरे, डॉ. रवी सातभाई, सिताराम हंबर्डे, योगेश बोराडे आकाश भोगाडे उद्धव भोगाडे आणि सुशिल हंबर्डे यांनी त्याचा सन्मान केला. गावातील नागरिकांनी शुभेच्छांचा वर्षाव करत आनंद व्यक्त केला. सत्कार सोहळ्यात अशोक अण्णा पोकळे म्हणाले, ''सौरभचा हा प्रवास प्रेरणादायी आहे. त्याने केवळ आपल्या कुटुंबाचे नाही, तर संपूर्ण समाजाचे नाव उज्ज्वल केले आहे.

यावेळी सौरभ जाधव म्हणाले, ''माझ्या यशाचे श्रेय आई-वडिलांच्या त्यागाला आणि गुरुजनांच्या मार्गदर्शनाला आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी स्वप्न साकार करण्यासाठी कष्ट आणि चिकाटीची गरज असते. सौरभचा प्रवास 'शून्यातून शिखराकडे' जाण्याचा आदर्श ठरला आहे. त्यांच्या या यशामुळे पंचक्रोशीतील तरुणांना एक नवी दिशा मिळाली आहे. सामान्य परिस्थितीतही मोठे यश मिळवता येते, हे सौरभने सिद्ध करून दाखवले. संपूर्ण आष्टी आणि पंचक्रोशीतील नागरिकांनी सौरभच्या यशाचा आनंद साजरा करत त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# मुसा खान यांना खान अब्दुल गफार खान या पुरस्काराने सन्मानित



बीड । प्रतिनिधी

जीवनात काही क्षण असे असतात, जे आपल्याला नवीन उंचीवर घेऊन जातात आणि आपल्या कार्याचा अर्थ अधोरेखित करतात. आजचा दिवस माझ्यासाठी तसाच एक महत्त्वाचा आणि सन्माननीय ठरला आहे. दैनिक अल्हीलाल समूहाच्या वतीने मला ''खान अब्दुल गफार खान'' या प्रतिष्ठित पुरस्काराने मुसा खान यांना सन्मानित करण्यात आला. हा पुरस्कार मुसा खान यांच्या कार्याची दखल घेत देण्यात आला आहे, आणि त्यासाठी मुसा खान अतिशय कृतज्ञ आहे.

मुसा खान बोलतात हा सन्मान मला एका बाजूला माझ्या कष्टांना प्रोत्साहन देतो, तर दुसऱ्या बाजूला मला समाजासाठी अधिक काही करण्याची जबाबदारीही देतो.''खान अब्दुल गफार खान'' या पुरस्काराचे नावच मला प्रेरणा देण्यासाठी पुरेसे आहे. त्यांच्या जीवनातील अहिंसेचा संदेश आणि समाजासाठी त्यांनी केलेले कार्य हे सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे. त्यांच्या नावाने दिला जाणारा हा सन्मान माझ्यासाठी फक्त एक पोचपावती नाही, तर अधिक मोठ्या उद्दिष्टांसाठी काम करण्याचा संदेशही आहे.

हा पुरस्कार मला एक गोष्ट स्पष्टपणे सांगून गेला - आपण समाजाचा एक भाग आहोत, आणि समाजासाठी आपल्यावर काही कर्तव्यं आहेत. समाजाने आपल्याला जे काही दिलं आहे, त्याची परतफेड करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. या पुरस्काराने माझ्यावर समाजाचा देणं लागतो याची जाणीव पुन्हा नव्याने करून दिली.मी दैनिक अल्हीलाल समूहाचे मनापासून आभार मानतो, ज्यांनी माझ्या कार्याची दखल घेत मला या सन्मानासाठी पात्र ठरवलं.

हा पुरस्कार फक्त माझा नाही, तर त्या प्रत्येक व्यक्तीचा आहे, ज्यांनी माझ्या कार्याला पाठिंबा दिला, मला प्रेरणा दिली, आणि माझ्या प्रवासात साथीदार बनले. हा सन्मान मला अधिक उत्साहाने, प्रामाणिकपणे, आणि तळमळीने समाजासाठी काहीतरी करण्यासाठी प्रेरित करतो. मी वचन देतो की मी माझं कार्य अधिकाधिक उत्कटतेने आणि समर्पणाने पुढे नेईन.सन्मानाचे हे क्षण आयुष्यातील दिशादर्शक असतात. ते आपल्याला फक्त कौतुकाचा आनंद देत नाहीत, तर समाजासाठी आणखी काही करण्याचं बळही देतात. हा पुरस्कार माझ्यासाठी अविस्मरणीय आहे आणि माझ्या पुढच्या प्रवासासाठी प्रेरणा ठरेल.

# शनी जन्मोत्सवानिमित्त कीर्तन महोत्सव व भागवत कथा

## बीड येथील शनी मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

बीड। प्रतिनिधी

शनीच्या साडेतीन पीठांपैकी अर्धपीठ असणारे बीडचे शनी मंदिर आहे. विक्रमादित्य राजाच्या काळापासून हे मंदिर अस्तित्वात आहे. जागृत देवस्थान म्हणून मंदिराची ख्याती असून देशभरातून भाविक मोठ्या संख्येने इथे र्शनासाठी येतात. यावर्षी दि. ०७ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता शनी जन्म (प्रकटदिन) आहे. त्यानिमित्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. दि.०१ जानेवारी ते ०८ जानेवारी दरम्यान भव्य कीर्तन महोत्सव व भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे.




मागील चार वर्षांपासून शनी जन्मोत्सवानिमित्त कीर्तन महोत्सव भव्य स्वरूपात साजरा केला जातो. आठ दिवस यानिमित्ताने पहाटे काकडा, सकाळी १० ते १२ गाथाभाजन, दुपारी १ ते ५ भागवतकथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ०८ ते १० कीर्तन व त्यानंतर हरिजागर असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. यावर्षी भागवत कथा प्रवक्ते सचिन महाराज सपकाळ यांची संगीत भागवत कथा आयोजित करण्यात आली आहे. कीर्तन महोत्सवात ह.भ.प. कैलास महाराज गवळी, भाऊसाहेब महाराज धांडे, गुरुवर्य प्रा.परशुराम महाराज मराडे, गणेश महाराज वारींगे, संतोष महाराज डोंगरे, त्र्यंबक महाराज मातकर, श्रीकृष्ण महाराज उबाळे यांची कीर्तने तर ह.भ.प.नितीन महाराज पिसाळ यांचे विशेष प्रवचन होणार आहे. दि.०७ जानेवारी रोजी सायंकाळी ठीक ०६ वाजता शनी जन्मोत्सवानिमित्त महारुद्राभिषेक होईल. दि. ०८ जानेवारी रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत बंकटस्वामी मठाचे मठाधिपती गुरुवर्य लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे काल्याचे कीर्तन व त्यानंतर महाप्रसाद होईल. शनी भक्तांनी वरील कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन शनी मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष रामनाथ खोड व विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

# वर्धमान महावीर इंग्लीश स्कूलचे वार्षिक स्नेह-संमेलन उत्साहात

कडा। प्रतिनिधी

वार्षिक स्नेह संमेलन शैक्षणिक आयुष्याचा महत्वाचा भाग असून यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या सुप्त कलागुणांना मंचाद्वारे सर्वांसमोर मांडण्याची मोठी संधी मिळते. यामुळे पालकांना देखील आपल्या मुलांमधील हुनर ओळखण्यास मदत होते. खेळाडू असेल किंवा कलाकार त्याची सुरुवात ही शाळेतील स्नेहसंमेलन कार्यक्रमातूनच होते.म्हणून वार्षिक स्नेह संमेलनामधे प्रत्येक विद्यार्थ्याने खेळ असेल किंवा सांस्कृतिक कार्यक्रम न चुकता भाग घेतला पाहिजे म्हणून कडा येथील 'वर्धमान महावीर चॅरीटेबल ट्रस्ट' संचलित महावीर इंग्लिश स्कूल या सीबीएसई बोर्ड मान्यताप्राप्त शाळेचा उडाण - २०२४ हा १३ वा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम आयोजित करून साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे भुमी अभिलेख विभागाचे अप्पर आयुक्त आनंद भंडारी उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये नवरस या संकल्पनेवर आधारीत श्रृंगार, हस्य, करुण, रौद्र, वीर, भय, बिभतस्य, अदभुत, शांत रस अशा नऊ रसावर चिमुकल्यांनी अप्रतिम असा नाट्य,नृत्य आविष्कार सादर करून प्रेक्षकांची मने जिकली,त्याचबरोबर मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र यांची रथयात्रा कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले, या प्रसंगाना प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली.

# पंचशिल नगरमध्ये भिमगित संगीत रजनी: प्रमोद शिंदे

बीड। प्रतिनिधी

भिमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त, ख्यातनाम गायक संतोष जोंधळेंचा भिमगीत संगीत रजनी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम बीड शहरातील पंचशील नगर येथे बुधवार (ता.१) जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास आंबेडकरी जनतेने उपस्थित राहावे. असे आवाहन आयोजक युवा नेते प्रमोद अण्णा शिंदे व पंचशील नगर मित्र मंडळ बीड यांच्या वतीने करण्यात आला आहे.

भिमा कोरेगाव शौर्य दिनाला आज २०७ वर्षे होत आहेत. देशातील आंबेडकरी चळवळीसाठी १ जानेवारी हा दिन शौर्य दिन म्हणून साजरा करून शूरवीरांना मानवंदना दिली जाते. त्या अनुषंगाने युवा नेते प्रमोद अण्णा शिंदे व पंचशील नगर मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमान भिमगीत संगीत रजनी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.



या कार्यक्रमास ख्यातनाम गायक संतोष जोंधळे चळवळीची गीते सादर करणार आहेत. पंचशील नगर येथे आंबेडकरी चळवळीचा प्रत्येक उपक्रम अतिशय हर्षोउल्हासात साजरा केला जातो. भीमा कोरेगावच्या सुवर्ण इतिहासाची पाने आंबेडकरी चळवळीतील तरुणांना माहिती व्हावीत, यासाठी भीमा कोरेगाव शौर्य दिनाच्या अनुषंगाने हा परिवर्तनवादी भीमगीत संगीत रजनी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.समाजाला परिवर्तनाकडे घेऊन जाण्यासाठी भीमगीते प्रभावी ठरली आहेत. त्यामुळे पंचशील नगर येथे होत असलेल्या कार्यक्रमास तमाम आंबेडकरी जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन युवा नेते प्रमोद अण्णा शिंदे व पंचशील नगर मित्र मंडळ यांनी केले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये भगवा फडकविण्यासाठी कामाला लागा- जगताप, मुळूक

बीड। प्रतिनिधी


बीडसह राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या काही वर्षांपासून रखडल्या होत्या. विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजणार आहे. राज्यात शिवसेनेला मिळालेल्या यशानंतर बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्येही शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसेनेने तयारी सुरु केली आहे. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने काल रविवार, दि.२९ डिसेंबर रोजी बीड जिल्हा शिवसेनेची बैठक दुपारी बारा वाजता हॉटेल ग्रॅंड यशोदा येथे संपन्न झाली.

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात राज्याला प्रगतीपथावर नेले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसह विविध योजना राबवून महिलांना स्वावलंबी करण्याचा प्रयत्न शिंदे यांच्या कार्यकाळात झाला. मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी केलेल्या उल्लेखनिय कामामुळे विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला मोठे यश मिळाले असून राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आली. आता राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देखील शिवसेनेची सत्ता यावी, या दृष्टीने शिवसेना तयारीला लागली असून मजबुतीने पुढे जाणार आहे. बीड जिल्ह्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी पूर्ण तयारीने कामाला लागा असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी व्यक्त केले. दरम्यान यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात प्रभाग निहाय गण, गटनिहाय नियोजन व चर्चा झाली. याप्रसंगी बीड जिल्ह्यातील शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना व सर्व अंगीकृत संघटनेचे सर्व पदाधिकारी आजी-माजी लोकप्रतिनिधी व शिवसैनिकांनी उपस्थित होते.

## बीड जिल्हा शिवसेनेची बैठक संपन्न




# 'माऊली'च्या विद्यार्थ्यांनी लुटला सहलीचा आनंद!



बीड। प्रतिनिधी

माऊली विद्यापीठ केज संचलित माऊली प्राथमिक विद्यालय बीड ची शैक्षणिक सहल दिनांक २४ डिसेंबर ते २८ डिसेंबर कालावधीमध्ये पंढरपूर, नृसिंहवाडी, कोल्हापूर, रत्नागिरी, गणपतीपुळे, कोयना धरण, सातारा मार्गे परत बीड अशी मोठ्या उत्साहात संप्पन्न झाली यावेळी विद्यार्थ्यांनी ऐतेहासिक, वैज्ञानिक तसेच भोगोलिक माहिती तर मिळविलीच त्याच बरोबर सहलीचा मनमुराद आंनद मिळवीला.कन्हेरी मठ येथील उभारलेल्या भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या प्रतिकृत,तारांगण,शाहू पॅलेस मधील म्युझियम मधील ऐतेहासिक ठेवा,रत्नागिरी येथील भगवती बंदर,कोयना धरणाची भव्यता याची माहिती मिळवत गणपतीपुळे येतील सागर किनाऱ्यावर मनमुराद आनंद घेतला.सहलीच्या यशस्वितेसाठी शाळेचे मुख्याध्यापक संतोष माने सहशिक्षका आवाड वंदना,थिटे संजीवनी,मनीषा कणसे,सहशिक्षक सचिन पवार,रमाकांत डोळस यांचे सहकार्य लाभले.शैक्षणिक सहल शाळेत पोहचल्यावर सर्व पालकांनी कौतुक करत सर्वांचे स्वागत केले.

# ऊस तोडणी कामगारांच्या विमा पॉलिसीचा प्रश्न येत्या आठवड्यात सोडवा; अन्यथा कोयता बंद आंदोलन - आ.धस

## मुख्यमंत्र्यांना भेटून आगामी अधिवेशनामध्ये कायदा करण्याची मागणी करणार

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यामध्ये गळीत हंगाम सुरू झालेला असून अद्यापही ऊस तोडणी कामगारांच्या अपघाती विम्याचा प्रश्न सोडविण्यात आलेला नाही ऊस तोडणी कामगारांच्या जीविताचा हा प्रश्न असल्यामुळे येत्या आठ दिवसात ऊस तोडणी कामगारांची विमा पॉलिसी करण्यात यावी अन्यथा महाराष्ट्र राज्यातील सर्व कारखान्यावरील ऊस तोडणी कामगार कोयताबंद आंदोलन करतील असा इशारा लोकनेते गोपीनाथ रावजी ऊस तोडणी कामगार वाहतूकदार मुकादम संघटनेचे प्रदेश संघटक आ. सुरेश धस यांनी दिला आहे

आष्टी येथे आयोजित लोकनेते गोपीनाथरावजी ऊस तोडणी कामगार, वाहतूकदार, मुकादम संघटनेच्या ''संवाद बैठकी ''मध्ये ते प्रमुख मार्गदर्शन करताना बोलत होते..

यावेळी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सुखदेव सानप, बाबुराव केदार, सुरेश तात्या वनवे, शिवाजी पवार, तात्याराम हुले उपस्थित होते

पुढे बोलताना आ. सुरेश धस म्हणाले की, महाराष्ट्र राज्यातील ऊस तोडणी कामगार संपूर्ण महाराष्ट्रभर आणि महाराष्ट्राच्या बाहेर देखील ऊस तोडणी साठी स्थलांतरित होत असतात ऊस तोडणी चे काम हे अत्यंत जिकरीचे असून अत्यंत कष्टप्रद असलेला हा व्यवसाय असून ऊस तोडणी कामगारांचे प्रचंड हाल ऊस तोडणी करताना होत असतात त्यांच्या शारीरिक कष्टाबरोबरच त्यांच्या अनेक सामाजिक समस्या देखील आहेत ऊस तोडणी करताना रात्री अपरात्री उसाच्या फडात ऊस तोडणी करावी लागते त्याच बरोबर वाहतूक करताना रस्त्यावरील धावणाऱ्या मोठ्या वाहनां बरोबर



रस्त्यावरून जा - ये करावी लागत असते यावेळी रस्ते अपघाताचा मोठा धोका पत्करावा लागत असतो त्यामुळे ऊस तोडणी कामगारांचा अपघाती जीवन विमा उतरवण्याची आवश्यकता असते यावर्षी गणित हंगाम सुरू होऊन देखील हा विमा पॉलिसीचा प्रश्न अद्यापही प्रलंबित आहे कारण या विम्याबाबत साखर कारखाना प्रशासनाचे म्हणणे असे आहे की ऊस तोडणी कामगारांचा विमा हा गोपीनाथरावजी मुंडे ऊस तोडणी महामंडळ यांचे अखत्यारीमध्ये आहे तर महामंडळाचे म्हणणे असे आहे की, या सर्व ऊस तोडणी कामगारांची नोंद महामंडळाकडे उपलब्ध होत नाही त्यामुळे नोंदणी नाही त्यामुळे ऊस तोडणी कामगार संघटनेचे म्हणणे असे आहे की, सर्व साखर कारखान्याच्या प्रशासनाकडे ऊस तोडणी कामगारांची नोंदणी करण्यात आलेली आहे.

ती नोंदणी ग्राह्य धरून सर्व ऊस तोडणी कामगारांच्या याद्या विमा कंपनीकडे पाठवून सर्व ऊस तोडणी कामगारांचा विमा उतरवण्यात यावा अशी संघटनेची मागणी असून राज्यातील सर्व कारखाना प्रशासन, महाराष्ट्र राज्य सामाजिक न्याय विभाग, आणि कामगार कल्याण विभाग यांनी येत्या आठ दिवसात हा विमा पॉलिसीचा प्रश्न निकाली काढला नाही तर महाराष्ट्र राज्यातील सर्व साखर कारखाना परिसरातील ऊस तोडणी करणारे कामगार ''कोयता बंद '' आंदोलन करतील असा इशारा देऊन आ. सुरेश धस पुढे म्हणाले की,

महाराष्ट्र विधान मंडळाच्या आगामी अधिवेशनापूर्वी ऊस तोडणी कामगार, मुकादम, वाहतूकदार यांच्यासाठी स्वतंत्र कायदा अस्तित्वात यावा ऊस तोडणी कामगार, साखर कारखानदार आणि मुकादम, वाहतूकदार यांचे एकत्रित हित जपणारा हा कायदा असावा याद्वारे ऊस तोडणी कामगार मुकादम आणि वाहतूकदार यांच्यातील उचल व्यवहाराला कायदेशीर संरक्षण देण्याची गरज असून त्यासाठी हा स्वतंत्र कायदा निर्माण करावा त्यासाठी आपण आगामी अधिवेशनामध्ये हा कायदा करण्यात यावा यासाठी प्रयत्न करणार आहोत असे सांगत या ऊस तोडणी कामगारांच्या समस्या कायमस्वरूपी सोडवल्या गेल्या पाहिजेत यासाठी संघटना सर्वतोपरी प्रयत्न करत असून आगामी काळामध्ये ऊस तोडणी कामगारांना शिळेपाके अन्न खावे लागते त्यावर उपाय म्हणून कम्युनिटी किचन योजनेतून ताजे अन्न उपलब्ध करून देण्याविषयी संघटनेची मागणी असून त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले

# बंदी असतानाही प्लास्टिक पिशव्यांचा खुलेआम वापर, व्यापाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहराच्या प्रत्येक दुकानावर,चौकात भाजी मंडई फळ बाजार परिसरात विक्रेत्याकडून बंदी असलेल्या प्लास्टिकच्या पिशव्या अंबाजोगाईत राजरोसपणे असताना नगरपरिषद प्रशासनाला ते दिसत नाही का? असा सवाल नागरिक करत आहेत रोजच्या कचऱ्यात प्लास्टिक मोठ्या प्रमाणात आढळून येत आहे महाराष्ट्र अतिघटनशील कचरा नियंत्रण नियम २००६ अंतर्गत तसेच २०१८ मधील अध्यादेशानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच नगरपरिषद यांच्यावर सिंगल युज प्लास्टिक वापरावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी टाकली मात्र बंदी असलेले प्लास्टिक नाल्यात, शहरात फिरणाऱ्या कचरा गाडीत इतर भागात येथे कुठून असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडतो तो अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांना



कधीच का पडत नाही? प्लास्टिकचा शहरातील जवळपास सर्वच दुकानदाराकडून वापर मोठ्या प्रमाणात वापर होताना दिसून येत आहे ५० मायक्रॉन व त्यापेक्षा कमी वापराच्या प्लास्टिक पिशव्या वापरण्यास कायद्याद्वारे बंदी घालण्यात आली आहे परंतु याच पिशव्याची जास्त विक्री अंबाजोगाईत होताना दिसत आहे प्लास्टिक वापरण्यावर बंदी असून पहिल्या कारवाईत जर बंदी असलेल्या प्लास्टिक पिशव्या विकताना सापडला तर पाच हजार रुपये दुसऱ्या कारवाई तीच व्यक्ती सापडली तर दहा हजार रुपये आणि तिसऱ्या कारवाई त सापडला तर पंचेवीस हजार रुपये दंड होऊ शकतो परंतु विक्रेते उत्पादक इतके चालाख आहेत की प्रत्येक कारवाई वेळी वेगवेगळ्या नावाने दंड भरला जातो याची दखल अधिकाऱ्यांनी घेण्याची गरज आहे.

## संपादक बाबा देशमाने यांना मातृशोक

दिंद्रुड । प्रतिनिधी

ज्येष्ठ पत्रकार, संपादक बाबा देशमाने यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई श्रीहरी देशमाने (वय ६७) यांचे आज रविवार, दिनांक २९ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजता निधन झाले. लक्ष्मीबाई देशमाने यांच्या पार्थिवावर अतिशय शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



गेली दोन महिने लक्ष्मीबाई देशमाने यांच्यावर बीड येथील एका खाजगी रूग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. अतिशय मनमिळाऊ स्वभावाच्या म्हणून त्यांची ओळख होती. चाटगाव ता.धारूर जि.बीड येथे लक्ष्मीबाई देशमाने यांच्या पार्थिवावर अतिशय शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या अंत्यविधीला पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. दरम्यान, मुंबई येथून प्रसिद्ध होणाऱ्या आरोग्यदूतचे संपादक बाबा देशमाने यांच्या त्या मातोश्री होत्या.

# चला लोकनेते विनायकराव मेटे यांनी सुरू केलेल्या व्यसनमुक्ती लढ्यात सहभागी होवू!


**व्यसनमुक्त बीड उपक्रमाला बळ मिळावे, ही एक सामाजिक चळवळ बनावी, यासाठी रॅलीत सहभागी व्हा - डॉ. ज्योती मेटे**

**३१ डिसेंबर रोजी शहरात जनजागृती रॅली**

बीड । प्रतिनिधी

थर्टी फर्स्टच्या नावाखाली डर्टी मुहूर्त साधत नवतरुण व्यसनाधीनतिकडे वळले जातात तरुणांनी व्यसनाधीनतेकडे न जाता सजग समाजासाठी निर्व्यसनी राहावे या उदात्त हेतूने लोकनेते स्व. विनायकराव मेटे यांनी गेल्या अनेक वर्षापासून ३१ डिसेंबर रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि जनजागृतीच्या माध्यमातून युवकांनी दारू ऐवजी गरमागरम दुधासोबत नववर्षाचे स्वागत करावे ही संकल्पना अंमलातआणून कार्यक्रमाचे आयोजन केले होते. व्यसनमुक्तीचे अभियान पुढे चालवण्यासाठी यंदा देखील व्यसनमुक्ती अभियाना अंतर्गत जनजागृती रॉलीचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती शिवसंग्रम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांनी दिली आहे.

लोकनेते स्व. विनायकरावजी मेटे साहेब यांच्या प्रेरणेने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी व्यसनमुक्त बीड अभियाना या उपक्रमा अंतर्गत अंतर्गत व्यसनमुक्ती



जनजागृती महारॅलीचे दी ३१ डिसेंबर रोजी आयोजन केले आहे. हि रॅली सकाळी ०८.०० वा. श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज क्रिडांगणा पासुन आरंभ होईल व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड येथे या रॅलीचा समारोप होईल. व्यसनमुक्त बीड उपक्रमाला बळ मिळावे, ही एक सामाजिक चळवळ बनावी, यासाठी ३१ डिसेंबर २०२४ रोजी बीड शहरात भव्य अशी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे असे डॉ. ज्योती मेटे म्हणाल्या तसेच या रॉलीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

दरवर्षी दिनांक ३१ डिसेंबरच्या रात्री होणारा सांस्कृतिक कार्यक्रम यावर्षी देशाचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या निधनानंतर राष्ट्रीय दुखवटा जाहीर करण्यात आल्यामुळे रद्द करण्यात येत आहे.

# साईराम अर्बन बँकेच्या संचालक मंडळावर आर्थिक फसवणूक प्रकरणी गुन्हे दाखल करण्याचे आदेश

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर येथील साईराम अर्बन बँकेच्या खतेधरकाची आर्थिक फसवणूक केल्या प्रकरणी जिल्हा व सत्र न्यायालय केज येथे खातेधारकांनी याचिका दाखल केली होती यावर सुनावणी होऊन संबंधित बँकेच्या संचालक मंडळावर गुन्हा नोंद करण्याचे आदेश अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय केज यांनी दिले आहेत.



साईराम अर्बन बँकेच्या धारूर शाखेमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैव्यवहारप्रकरणी खातेधरक सुहास मोरलवर ९,६६,००० व अभिमन्यू काळे ९,१२,५४१ यांच्या नावे एकूण साईराम १८ लाख ७८ हजार ५४१ रुपये बँकेत जमा केले होते मागील अनेक दिवसापासून बँकेकडे पैशांची मागणी केली असता त्यांना बँकेच्या कर्मचारी व संचालक मंडळाकडून पैसे परत दिले नसल्याने शेवटी त्यांनी आपली आर्थिक फसवणूक झाल्याची संयुक्तिक याचिका अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय केज येथे दाखल केली होती या याचिकेवर सुनावणी होऊन साईराम अर्बन बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळ व शाखेच्या कर्मचाऱ्यांविरुद्ध आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हे नोंद करून सखोल चौकशी करण्याचे करण्याचे आदेश अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय केज च्या न्यायाधीशांनी दिले आहेत व

याचिका करते सुहास मोरलवार वी.साधना व इतर, अभिमन्यू काळे वि.साधना व इतर यांनी आर्थिक फसवणूक प्रकरणी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय केज यांचा निकाल.जिल्हा न्यायधीश के. डी. जाधव केज यांनी कलम ४२०,४०९, ४६५,४६७ भा.द. वी. १८६० कलम ३,४,५ महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबधांचे संरक्षण अधिनियम १९९९ प्रमाणे साईराम अर्बन बँकेच्या व्यवस्थापकावर गुन्हे दाखल करून सखोल चौकशी करण्याचे आदेश दिल्याने याचिकाकर्त्यांनी समाधान व्यक्त केले याचिकाकर्त्यांच्या कडून ॲड ए.एस .साखरे यांनी काम पाहिले व त्यांना ॲड एल. व्ही.गायकवाड व ॲड एस. ए. शेख यांनी सहकार्य केले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या केंद्रीय युवक महोत्सवात योगेश्वरी महाविद्यालयाचे यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील योगेश्वरी महाविद्यालयाने संभाजी नगरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या केंद्रीय युवक महोत्सवात भारतीय शास्त्रीय नृत्य तसेच लघुपट निर्मिती या प्रकारात यश प्राप्त केले आहे. भारतीय शास्त्रीय नृत्यामध्ये महाविद्यालयाची बी. एस.स्सी.तृतीय वर्षाची विद्यार्थिनी ईश्वरी खाडे हिने भरतनाट्यम कलाप्रकारात 'शिव शंभो' हे किर्तनम सादर केले. त्यास प्रथम पारितोषिक प्राप्त झाले ईश्वरी खाडे हिने सलग दोन वर्षे या कलाप्रकारात प्रथम पारितोषिक पटकावले आहे.

सध्याच्या युगात ऑनलाईन गेमिंग मुळे होणारे नुकसान या ज्वलंत विषयावर सादर करण्यात आला. या लघुपटास तृतीय पारितोषिक मिळाले. लघुपट कथा बी.एस्सी. तृतीय वर्षाचा विद्यार्थी निखिल यादव याने याचे चित्रिकरण,संपादन केले या



कलाप्रकारात यश केंद्रे,निखिल जाधव,कृष्णा शिंदे,सतीश जाधव,श्रावणी कुलकर्णी,पूजा कुलकर्णी, ईश्वरी खाडे,पूनम मोरे, श्रवणी तारसे,वैष्णवी जाधव,दिव्या पौळ, सृष्टी आचार्य,श्रद्धा लोमटे, प्रथमेश दहीवडे आदर्श डोंगरे यांनी सहभाग घेतला व उत्कृष्ट सादरीकरण केले. या विद्यार्थ्यांना प्रा.डॉ. संतोष सुर्वे,प्रा.डॉ.व्ही. जी.कळलावे प्रा. पारेकर यांनी मार्गदर्शन केले. या सर्वांचे योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष गणपत व्यास, कार्यकारी उपाध्यक्ष ॲड.जगदीश चौसाळकर,सचिव कमलाकर चौसाळकर,कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य, सहसचिव प्रा.भीमाशंकर शेटे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्ही.कानेटकर, उपप्राचार्य आर.व्ही. कुलकर्णी,कार्यालयीन अधीक्षक अजय चौधरी, आदींनी अभिनंदन केले आहे.

# मारफळा विद्यालयाचे वरिष्ठ लिपिक विठ्ठलराव बाबर सेवानिवृत्त

**रणवीरराजे पंडित यांच्या उपस्थितीत सेवापूर्ती सोहळा संपन्न**

गेवराई । प्रतिनिधी

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ, गेवराई संचलित माध्यमिक विद्यालय मारफळा येथील वरिष्ठ लिपीक श्री.विठ्ठल सोपानराव बाबर हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त गुरुवार दि.२६ डिसेंबर रोजी सेवापूर्ती कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून शारदा स्पोर्ट अकॅडमीचे संचालक युवा नेते



रणवीर पंडित, अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गुलाबराव कुटे, तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, मारफळा चे सरपंच शरदराव कबले , गणपत महाराज उबाळे, शिवाजी महाराज कुटे, माजी सभापती वसंतराव उबाळे, माजी उपसभापती ज्ञानोबा आबुज, प्रा.काशिनाथ गोगुले, बाजार >> पान २ वर...

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी पूर्ण तयारीने कामाला लागा- जगताप, मुळूक, गलधर



### बीड जिल्हा शिवसेनेची बैठक संपन्न!

बीड । प्रतिनिधी

बीडसह राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या काही वर्षांपासून रखडल्या होत्या. विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजणार आहे. राज्यात शिवसेनेला मिळालेल्या यशानंतर बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्येही शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसेनेने तयारी सुरु केली आहे. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब >> पान २ वर...

# सुरेश धस यांचा आणखी एक खोटारडेपणा उघड

**अनंत प्रतिष्ठानच्या दवाखान्याला धनंजय मुंडेंनी मदत केली, कधीही कोणतीही अट घातली नाही**

**सुरेश धस यांनी आमच्याशी कुठलीही चर्चा न करता आमचे नाव घेऊन केलेले आरोप खोटे - डॉ. महेंद्र लोढा**

**परळी । प्रतिनिधी**

मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर तोंडाला येईल ते आरोप करत सुटलेल्या आमदार सुरेश धस यांचा आणखी एक धाधांत खोटारडेपणा उघडकीस आला आहे. प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ.महेंद्र लोढा व डॉ. राजेंद्र लोढा यांच्या अनंत प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या रुग्णालयास सिरसाळा येथे जमीन देण्याबाबत धनंजय मुंडे यांनी ट्रस्ट मध्ये घेण्याची किंवा अन्य कोणतीही अट घातल्याचे सुरेश धस यांनी केलेले आरोप डॉ.महेंद्र लोढा यांनी फेटाळून लावले आहेत.

काही वर्षांपूर्वी अनंत प्रतिष्ठान या आमच्या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून वृद्धाश्रम व एच आय व्ही हॉस्पिटल उभारण्यासाठी तत्कालीन महसूल मंत्री नारायण राणे यांच्या माध्यमातून आम्हाला शिरसाळा येथे जमीन मिळाली होती. त्यासाठी धनंजय मुंडे यांनी आम्हाला मदतच केली. शिवाय त्यांना किंवा त्यांच्या जवळच्या कुणाला अनंत प्रतिष्ठानच्या ट्रस्टमध्ये घेण्याबाबत त्यांनी कोणतीही अट घातली नव्हती. याबाबत सुरेश धस यांनी काल माध्यमांमध्ये केलेले वक्तव्य ऐकून मला धक्काच बसला असे मत डॉक्टर महेंद्र लोढा यांनी व्यक्त केले आहे.

त्यावेळी धनंजय मुंडे यांनी या सामाजिक कार्यासाठी मदत तर केलीच शिवाय एखाद्या कंपनीच्या सीएसआर फंडातून काही निधी मिळण्यासाठी ही आपण प्रयत्न करू अशा स्वरूपाचे आश्वासनही आम्हाला दिले होते.

डॉक्टर महेंद्र लोढा हे प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ असून त्यांचे यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथे मोठे हॉस्पिटल आहे. आमदार सुरेश >> पान २ वर...

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# हिरवे साप वळवळतात अन् वातावरण खराब करतात; पुण्यातील घटनेवर मंत्री नितेश राणेंची जीभ घसरली



पुणे । प्रतिनिधी

राज्यातील पुरोगामी विचाराचं शहर आणि शैक्षणिक पंढरी असलेल्या पुणे शहरात भगवा आणि हिरव्या रंगाचा वाद रंगल्याचे पाहायला मिळत आहे. शहरातील सदाशिव पेठेमध्ये एका भिंतीवर हिरवा रंग लावून चादर आणि फुलं चढवल्याचा प्रकार समोर आला होता. या घटनेची दखल घेत भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांनी भींतीचा रंगच बदलून टाकला आहे. मेधा कुलकर्णी आणि त्यांच्या समर्थकांनी भींतीवरील त्या हिरव्या रंगावरती भगवा रंग देऊन त्या ठिकाणी एक गणपतीचा फोटो ठेवला आहे. पुणे शहरातच नाही, तर महाराष्ट्रसह इतर अनेक ठिकाणी हे प्रकार सध्या वाढले असल्याचा दावाही मेधा कुलकर्णी यांनी केला. आपल्या आजूबाजूला काय घडतंय याकडे एक सजग हिंदू म्हणून आपण लक्ष देऊया कृती करूया, असं आवाहनही त्यांनी केलं. त्यानंतर, आता भाजपचे हिंदुत्ववादी नेते आणि मंत्री नितेश राणे (छळींशीह ठरपश) यांनीही पुण्यातील घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे.

पुण्यातील घटनेवर बोलताना मी मेधाताईंचं अभिनंदन करतो, असे म्हणत मेधा कुलकर्णी यांचे समर्थनही राणेंनी केलं. हिरवे आक्रमण होत आहेत, हिरवे साप वळवळतात आणि वातावरण खराब करतात. पण, हिंदू समाज म्हणून हे काम केलं पाहिजे, असे वळवळणारे साप ठेचलेत पाहिजेत, असे मंत्री नितेश राणे यांनी म्हटले. कडवट हिंदुत्ववादी म्हणून राज्यात असे प्रकार होणार नाही हा संदेश आधीच गेलाय. हिरवं आक्रमण थांबवणं आमचं कर्तव्य आहे, अशा शब्दात नितेश राणेंनी नेहमीप्रमाणे भूमिका मांडली. मात्र, नितेश राणे हे राज्याचे मंत्री आहेत, त्यामुळे मंत्री म्हणून त्यांची जीभ घसरल्याचे बोलले जात आहे.

### अयोध्या मिळवलं, श्रीकृष्णभूमीही मिळवणार

जे आमचं आहे ते आम्हाला मिळालं पाहिजे आणि त्यावर आमचा अधिकार आहे. इस्लामिक आक्रमण झालं, मंदिरावर मस्जिदी बांधण्याचा कार्यक्रम केला. मात्र, ही भूमी आमची आहे, येथील इंच न् इंच जमीन आमची आहे. अयोध्या मिळवलं, आणि श्रीकृष्ण भूमीदेखील मिळवून राहणार असे म्हणत मंत्री नितेश राणे यांनी मुथरा येथील जागेवरुन पुन्हा एकदा हिंदुत्वाच्या मुद्दयावरुन परखड मत व्यक्त केलं आहे. एका बाजूला कायदेशीर मार्गाने चालत आहोत आणि त्याचबरोबर हिंदू समाजात जागृती झाली पाहिजे. आपण एकत्र आहोत, आपल्याकडून जे घेतलं गेलं तिथे आपलं मंदिर आहे, जे मिळवलं पाहिजे, अशा शब्दात नितेश राणेंनी आपली भूमिका मांडली आहे.

# वाकड येथील १५ एकर जागा पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या ताब्यात



पिंपरी । प्रतिनिधी

वाकड मधील पेठ क्रमांक ३९ येथील १५ जागा पीएमआरडीए कडून पिंपरी-चिंचवड पोलिसांना मिळाली. शुक्रवारी (दि. २७) या जागेचा आगाऊ ताबा पोलिसांना मिळाला आहे. एक वर्ष आठ महिने एवढ्या कमी कालावधीत जागेबाबत पाठपुरावा करून जागा मिळवण्यात आयुक्त विनयकुमार चौबे यांना यश आले आहे.

पिपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाची स्थापना ६ वर्षांपूर्वी झाली. तरी देखील पिंपरी चिंचवड आयुक्त कार्यालय, पोलीस अधिकारी यांची निवासस्थाने, पोलीस विभागाचे मुख्यालय व इतर अनुषंगीक कार्यालये यांना स्वतंत्र जागा उपलब्ध नव्हती. त्यामुळे प्रशासकिय कामकाज करणे व कामकाज सुरळीतपणे चालविण्यामध्ये खुप मोठ्या प्रमाणावर अडचणी निर्माण होत होत्या. आयुक्त विनयकुमार चौबे यांनी डिसेंबर २०२२ मध्ये पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार हाती घेतल्यानंतर ही बाब विचारात घेऊन आयुक्तालयासाठी अत्यावश्यक असणार्या जागा प्राप्त करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार जागांचा शोध सुरु झाला. पीएमआरडीएच्या ताब्यात असणाऱ्या वाकड येथील पेठ क्रमांक ३९ येथे मोकळी जागा असल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यातील १५ एकर जागा मिळण्यासाठी पोलीस आयुक्तांनी पीएमआरडीएकडे प्रस्ताव पाठवला. पीएमआरडीएने हा प्रस्ताव राज्याच्या नगर विकास विभागाकडे पाठवला. तिथे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी व्यक्तिशः पाठपुरावा करून जागा मिळवण्यासाठी प्रयत्न केले.

# रेल्वेत टीसी असल्याचा केला बनाव; माजी सैनिकाला लावला १७ लाखांनी चुना; पुण्यातील महिलेचा प्रताप




पुणे : आपण रेल्वेत तिकीट कलेक्टर असून तुमच्या कुटुंबातील दोघांना रेल्वेत नोकरी लाऊन देतो, असं खोटं आश्वासन देत महिलेने माजी सैनिकाला अधिकाऱ्याला १७ लाखांनी गंडा घातल्याची घटना उघडकीस आला आहे. याप्रकरणी पुणे पोलिसांनी आरोपी महिलेविरोधात गुन्हा दाखल केला आहे. संगिता पाटणे, असं या महिलेचं नाव असून तिचा शोथ सुरु असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

मीडिया रिपोर्टनुसार, सुरेश नाईक फसवणूक झालेल्या माजी लष्करी अधिकाऱ्याचं नाव आहे. सुरेश नाईक हे २०२१ मध्ये सैन्यातून निवृत्त झाले. त्यानंतर त्यांनी इलेक्ट्रीशन म्हणून काम करण्यास सुरुवात केली. पुढे सप्टेंबर २०२२ मध्ये त्यांना इलेक्ट्रीकचं काम करण्यासाठी एका महिलेचा कॉल आला, तिने तिचं नाव संगिता पाटणे असं सांगितलं. महिलेच्या कॉलनंतर सुरेश नाईक काम करण्यासाठी महिलेच्या वनवाडी येथील घरी गेले. त्यावेळी महिलेने त्यांना आपण रेल्वेत तिकीट कलेक्टर असल्याचं सांगितलं. सुरेश नाईक यांचा विश्वास संपादन करण्यासाठी महिलेने त्यांना तिचे आयकार्डही दाखवले. याशिवाय तुमच्या मुलींना रेल्वे नोकरी लावून देतो, असं आश्वासनही दिलं. दरम्यान, नोव्हेंबर २०२२ मध्ये महिलेने सुरेश नाईक यांना फोन करत ११.५ लाख रुपयांची मागणी केली. पतीला ब्रेन ट्यूमरचा त्रास असून त्याचे ऑपरेशन करायचं आहे, इंशूरन्सचे पैसे आल्यावर तुमचे पैसे परत देईन, असं तिने सांगितलं. त्यामुळे सुरेश नाईक यांनी महिलेला पैसे दिले. पुढे मे २०२३ मध्ये महिलेने पुन्हा सुरेश नाईक यांना फोन करत कुटुंबातील दोघांना नोकरी लावून देण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी केली. सुरेश नाईक यांनी पुन्हा महिलेला ५.५ लाख रुपये दिले. मात्र, बरेच महिने नोकरी न मिळाल्याने सुरेश नाईक यांनी महिलेला पैसे परत मागितले. मात्र, तिने पैसे देण्यास नकार दिला. तसेच महिलेच्या मुलाने सुरेश नाईक यांना जीवे मारण्याची धमकी दिली. दरम्यान, सुरेश नाईक यांच्या तक्रारीनंतर आता पोलिसांनी आरोपी महिलेविरोधात तक्रार दाखल केली आहे.

# कृत्रिम बुद्धिमत्ता आव्हान नाही, तर संधी ; केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री सुकांत मजुमदार यांचे मत



पुणे । प्रतिनिधी

कृत्रिम बुद्धिमत्ता शिक्षण अधिक सुलभ करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे देशाच्या कानाकोपर्यात गुणवत्तापूर्ण शिक्षण शक्य आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ही शिक्षकांना पर्याय ठरू शकत नाही. परंतु, मूल्यमापन, नावीन्यपूर्ण प्रयोगांसाठी उपयुक्त ठरणार आहे. या दृष्टीने कृत्रिम बुद्धिमत्तेकडे आव्हान नाही, तर संधी म्हणून पाहिले पाहिजे, असे मत केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री सुकांत मजुमदार यांनी मांडले.

पुणे इन्स्टिटच्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंटतर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन मजुमदार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. आयआयएम अहमदाबादचे संचालक प्रा. भारत भास्कर, आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराय मेत्री, प्रा. रवीकुमार जैन, डॉ. चंदन चौधरी, पीआयबीएमचे अध्यक्ष रमण प्रीत, संचालक डॉ. राजश्री पिल्लई या वेळी उपस्थित होते. मजुमदार म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे केवळ धोरण नाही, तर देशाच्या शिक्षणाच्या परिवर्तनातील मैलाचा दगड आहे. त्याद्वारे देशातील शिक्षण व्यवस्था आणि शैक्षणिक परिसंस्थेत आमूलाग्र बदल घडणार आहेत. बहुविद्याशाखीय दृष्टिकोन, तंत्रज्ञानाच्या वापरामुळे हे धोरण पथदर्शी ठरणार आहे. तसेच देशाला नवसंकल्पना आणि शिक्षणाच्या क्षेत्रात 'ग्लोबल हब' म्हणून आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ही आता केवळ संकल्पना राहिलेली नाही, तर परिवर्तनाचे साधन होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साधनांचा वापर करून विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वरुपात शिक्षण देणे शक्य होऊ शकेल. विद्यार्थ्यांमधील उणीवा, बलस्थाने हेरून त्यांना त्यांच्या कुवतीनुसार शिक्षण देता येईल. अटल इनोव्हेशन मिशनच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शाळा महाविद्यालयात एआय लॅबद्वारे विद्यार्थ्यांना डाटा विश्लेषण, कोडिंग आणि रोबोटिक्स शिकवले जात आहे. त्याद्वारे विद्यार्थ्यांना भविष्यातील रोजगारसंधींसाठी रोजगारक्षम करता येईल. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराबरोबरच त्याचा नैतिकतेने वापर करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारीही आहे. या तंत्रज्ञानाचा उपयोग करून बुद्धिमान देश घडवता येऊ शकतो, असेही त्यांनी सांगितले. पीआयबीएमने आजवर आपले वेगळेपण अधोरेखित केले आहे. पुस्तकी शिक्षणापेक्षा अनुभवावर भर दिला आहे. आता कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) विविध क्षेत्रात वापरली जाणार आहे. त्यामुळे नव्या संधी निर्माण होणार आहेत. त्यासाठी मोठ्या प्रमाणात संशोधनाची गरज आहे, असे मत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रमणप्रीत यांनी व्यक्त केले.


# वासुली फाटा येथे ५.५ लाखांच्या पार्टची चोरी

आंबेठाण । प्रतिनिधी

वासुली फाटा ( ता.खेड ) येथील एका वर्कशॉपमधून साडे पाच लाख रुपयांच्या स्पेअर पार्टची चोरी झाली आहे. याबाबत अतुल मारुती पांगारे यांनी म्हाळुंगे एमआयडीसी पोलिस स्टेशनला फिर्याद दिली आहे. २६ तारखेला पहाटे २ च्या दरम्यान ही घटना घडली.

वासुली फाटा येथे गणेश घुले यांच्या मालकीच्या लोखंडी शेडमध्ये अतुल पांगारे यांचा पांगारे ऑटो पार्ट वर्क नावाने दुचाकी आणि चारचाकीचा वाहनांचे छोटे पार्ट बनविण्याचा व्यवसाय आहे. त्यांच्या लोखंडी शेडचे पत्रे काढून अज्ञात चोरट्यांनी वाहनांचे ५३६५९३ रुपयांच्या पार्टची चोरी केली आहे. अधिकचा तपास म्हाळुंगे पोलिस करीत आहेत.

# 'या लढाईत प्राजक्ता एकटी नाही', सुरेश धसांच्या वक्तव्यावर चित्रा वाघ यांचं परखड



पुणे: भाजप आमदार सुरेश धस यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्या वरती टीका करताना अभिनेत्री प्राजक्ता माळीसह इतर अभिनेत्रींचा नाव घेतलं. त्यानंतर आता यावरून चांगलाच वाद निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. सुरेश धस यांच्या वक्तव्याच्या विरोधात अभिनेत्री प्राजक्ता माळीने महिला राज्य महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

यासंदर्भामध्ये प्राजक्ता माळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेणार असल्याची माहिती तिने दिली आहे. प्राजक्ता माळीने यासंदर्भात पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली आणि त्यानंतर आता भाजपचे आमदार आणि मंत्री चंद्रकांत पाटील, भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी देखील प्राजक्ता माळीला पाठिंबा दर्शवला आहे, अनेक कलाकारांनी देखील प्राजक्ता माळीला समर्थन देत सोशल मीडिया वरती पोस्ट लिहल्या आहेत, त्याचबरोबर भाजपच्या नेत्या चित्रा वाघ यांनी देखील त्यांच्या सोशल मीडिया एक्स अकाउंटवरती प्राजक्ता माळीला टॅग करत एक पोस्ट शेअर केली आहे.

चित्रा वाघ यांनी त्यांच्या सोशल मिडिया एक्स (पुर्वीचे ट्विटर)वरती पोस्ट लिहून प्राजक्ता माळीला समर्थन दिलं आहे. 'स्त्रीचा सन्मान याला भाजपाचे सर्वोच्च प्राधान्य कायमच राहीले आहे. त्यामुळे कुणालाही कुणाचेही नाव घेऊन अशा पद्धतीने चिखलफेक करण्याचा अधिकार नाही, आपण सर्वांनी मिळून एका चांगल्या समाजाची निर्मिती करण्यासाठी कायम पुढाकार घेतला पाहिजे, या लढाईत प्राजक्ता एकटी नाही हा विश्वास देते, असं त्यांनी म्हटलं आहे. स्त्रीचा सन्मान याला भाजपाचे सर्वोच्च प्राधान्य कायमच राहीले आहे. त्यामुळे कुणालाही कुणाचेही नाव घेऊन अशा पद्धतीने चिखलफेक करण्याचा अधिकार नाही. आपण सर्वांनी मिळून एका चांगल्या समाजाची निर्मिती करण्यासाठी कायम पुढाकार घेतला पाहिजे.

# मावळमधील भाविकांच्या बसचा पंढरपूरजवळ अपघात; दोघांचा मृत्यू, ३२ जण जखमी



नाणे मावळ - देवदर्शनासाठी गेलेल्या मावळ तालुक्यातील भाविकांच्या बसचा पंढरपूरनजीक भीषण अपघात झाला आहे. रविवारी (दि.२९) सकाळी सव्वासहा वाजता पंढरपूर तालुक्यातील भटुंबरे येथे हा अपघात झाला. भाविकांची बस आणि भरधाव ट्रकची समोरासमोर धडक झाली.

यात बसमधील दोन भाविकांचा गंभीर जखमी झाल्याने मृत्यू झाला आहे. तर उर्वरीत ३२ जण जखमी असून यातील १२ जण गंभीर जखमी आहेत. बेबीबाई सोपान म्हाळसकर (रा. नाणे, ता. मावळ) व जान्हवी म्हाळसकर (वय ७, रा. नाणे, ता.मावळ) अशी अपघातात मृत पावलेल्यांची नावे आहेत. बसमधील बहुतांश भाविक हे मावळमधील नाणे गाव व लोणावळा येथील रहिवासी आहेत. सर्वजण जवळील नातलग व कुटुंबीय असल्याची माहिती प्राप्त होत आहे. राजनंदिनी ट्रॅव्हल्सच्या बसने (एमएच १४/ एलएस ३९५५) पंढरपूर येथे देवदर्शनासाठी जात होते. पंढरपूरमधील भटुंबरे गावाजवळ त्यांच्या बसचा व ट्रकचा समोरासमोर अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की बस व ट्रकच्या समोरील भागाचा चक्काचूर झाला आहे. दोन्ही वाहने अतिवेगात असल्याने अपघाताची तीव्रता अधिक होती. बसमधील एक मुलगी व एक महिला जागीच मृत पावली. जखमींपैकी गंभीर जखमी असलेल्या १२ जणांना तत्काळ सोलापूर येथे हलविण्यात आले. इतर २० जणांवर पंढरपूर येथील रुग्णालयात उपचार सुरु आहेत. अपघाताची माहिती मिळताच नाणे गावावर शोककळा पसरली असून अपघातग्रस्तांचे नातेवाईक तत्काळ पंढरपूरच्या दिशेने रवाना झाले. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमी प्रवाशांना बाहेर काढले. जखमींना रुग्णालयात हलविण्यात आले. अपघातामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली होती. दोन्ही बाजुने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. अपघातग्रस्त वाहने रस्त्यातून बाजुला करण्यात आली व वाहतूक सुरळीत करण्यात आली.

# मंत्री संजय शिरसाठ ॲक्शन मोडमध्ये, पुण्यातील वस्तीगृहाची पाहणी



पुणेः सामाजिक न्याय खात्याचे मंत्री संजय शिरसाठ यांनी पुणे आणि पिंपरी-चिंचवड येथील मुलींच्या वस्तीगृहाला भेट देत पाहणी केली. यावेळी त्यांनी या विभागातील अधिकारी व कर्मचारी वर्गाची बैठक घेत विद्यार्थ्यांना सुविधा न पुरवणाऱ्या ठेकेदारांविरोधात कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. तसेच वसतीगृहाचा कंत्राटदार कोण आहे, तो कोणत्या राजकीय पक्षाशी संलग्न आहे किंवा एखाद्या नेत्यासोबत त्याचा संबंध आहे, हे न पाहता थेट कारवाई करावी, अशी सूचना त्यांनी बैठकीत दिली. छत्रपती संभाजीनगर येथील वस्तीगृहाची पाहणी केल्यानंतर त्यांनी राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या वस्तीगृहाची पाहणी करणार असल्याची माहिती दिली. ते काल दि. २८ डिसेंबर रोजी पुण्यात आले होते.

काही दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगर येथील वस्तीगृहाला सामाजिक न्याय खात्याचे मंत्री संजय शिरसाठ यांनी अचानक भेट दिली. यामुळे येथील अधिकारी कर्मचाऱ्यांची मोठी धांडल उडाली होती. येथील विद्यार्थ्यांनी शिरसाठ यांच्याकडे वस्तीगृहाची झालेली दुर्देशा आणि विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या असुविधांचा पाढाचा वाचला. यावेळी शिरसाठी यांनी वस्तीगृहाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना खडे बोल सुनावले आणि विद्यार्थ्यांना सर्व सोई मिळाव्यात, अशा सूचना दिल्या. यानंतर त्यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवड येथील वस्तीगृहाला भेट देत राज्यातील इतरही वस्तीगृहांची पाहणी करणार असल्याचे सांगितले. सामाजिक न्याय विभागाअंतर्गत चालवण्यात येणाऱ्या वस्तीगृहाची पाहणी केली असून येथील परिस्थिती समाधनकारक आहे. निश्चितच यामध्ये काही उणिवा आहेत. या उणिवा दूर करून विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारच्या सुविधा द्याव्यात, अशा प्रकारच्या सूचना अधिकाऱ्यांना केल्या आहेत. असे त्यांनी माध्यमांना दिलेल्या प्रतिक्रियेत सांगितले.

# समुद्रात बुडून मृत्युमुखी पावलेल्या मुख्याध्यापक देशमुख यांच्यावर अंत्यसंस्कार

शिरूर । प्रतिनिधी



रायगड जिल्ह्यातील काशीद समुद्रात बुडून मृत्युमुखी पावलेले मुख्याध्यापक धर्मेंद्र शहाजी देशमुख (वय ५५) यांच्यावर शनिवारी (ता. २८) त्यांच्या शिरूर तालुक्यातील आंबळे-कळवंतवाडी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. देशमुख यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, मुलगी व भाऊ असा परिवार आहे. देशमुख हे हवेली तालुक्यातील पिसोळी येथील महात्मा जोतिबा फुले विद्यालयात मुख्याध्यापक म्हणून काम करीत होते.

त्याचबरोबर शिक्षक संघटनेचे विश्वस्त, तसेच शिरूर तालुका मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. ते उत्कृष्ट क्रीडा शिक्षक म्हणून तालुक्यात परिचित होते. अंत्यविधीसाठी डी. सि. एम. सोसायटी पुणेचे जनरल सेक्रेटरी मा. विशालभाऊ शेवाळे, मा. सभापती विश्वास आबा कोहकडे, आंबळे व कळवंत वाडी गावचे सर्व आजी, माजी सरपंच, सर्व आजी माजी चेअरमन, सर्व शिक्षक संघटना प्रतिनिधी, अनेक मुख्याध्यापक, शिक्षक, व आंबळे आणि पंचक्रोशी तील ग्रामस्थ उपस्थित होते.

# विजयस्तंभ दिनानिमित्त ग्रामीण पोलिसांचा मोठा फौज फाटा



पुणे - १ जानेवारी २०२५ रोजी कोरेगाव भीमा येथे विजयस्तंभ दिनासाठी मोठ्या प्रमाणावर अनुयायांची गर्दी सोहळ्याच्या ठिकाणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर येथे कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पुणे शहर पोलिसांसह पुणे ग्रामीण पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. सुरक्षेच्या कारवास्तावर पोलिसांकडून खबरदारी घेण्यात आली आहे. गर्दीचे नियोजन करण्यासाठी ग्रामीण पोलिसांकडून ४ हजार ८०० पोलीस कर्मचारी बंदोबस्तात तैनात करण्यात येणार आहे.

२०१८ मध्ये येथे मोठ्या प्रमाणावर दंगल उसळल्याची घटना घडली होती. यामुळे तेव्हापासून येथे दरवर्षी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्या येतो. तसेच गर्दीचे नियोजन करण्याच्या दृष्टाने बंदोबस्ताची आखणी करून खबरदारी घेण्यात येते. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी याबाबतची माहिती दिली. तसेच गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात येणार असल्याची माहिती देखील देण्यात आली असून घातपाती विरोधी पथके असणार आहेत.

### असा आहे बंदोबस्त

या ठिकाणी ३३६ पोलीस अधिकारी, ३ हजार ८० पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे दीड हजार जवान, राज्य राखीव पोलीस दलाच्या १२ तुकड्या तैनात करण्यात येणार आहे. तसेच अग्नीशमन दलाचे जवान देखील तैनात असणार आहेत. आत्पकालीन परिस्थिसाठी वैद्यकीय सुविधा देण्यात येणार आहे. चाकण रस्त्यावरील २३ एकर मोकळ्या जागेवार वाहने पार्किंग करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणाहून अनुयायांना विजयस्तंभापर्यंत पोहोचण्यासाठी तसेच परतण्यासाठी बस उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.